
# माणूस

शनिवार । १९ मे १९७९

७५ पैसे

# सावरकर जयंतीनिमित्त दोन लेख तर्कदुष्ट समजुतींवर हल्ला चढवणारे....

पृष्ठ....१४

एक :

# गरीब आजवर गरीब का राहिले ?

' कारण ग्रामीण विभागाकडे दुर्लक्ष झाले, शहरांना प्राधान्य मिळाले, ' असे मत एका नामवंत ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाने भारताच्या संदर्भात व्यक्त केले आहे.
या अर्थशास्त्रज्ञाचे ' Why poor people stay poor ? ' हे पुस्तक सध्या सर्वत्र गाजत आहे.
या पुस्तकाचा विस्तृत परिचय....

दोन :

या ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य हवे असे आजवर फक्त मूठभर सर्वोदयवादी–गांधीवादी सांगत होते. दिल्लीत भव्य किसान मेळावा संघटित करून चरणसिंगांनी या विचारामागे राजकीय ताकद उभी केली; पण–
चरणसिंगांकडे आकृष्ट झालेला किसान कोणत्या श्रेणीतला ?
तो श्रीमंत जमीनदार की मध्यम–गरीब शेतकरी ?
कोल्हापूरला न झालेल्या चरणसिंगांच्या किसान मेळाव्यानिमित्त विजय परुळकर यांनी घेतलेली एका मेळावाप्रमुख बागायतदाराची मुलाखत.....

तीन :

चरणसिंगांच्या मागे जाऊ पाहणारा किसान गरीब असो–नसो. आपल्याकडे बहुसंख्येने असणाऱ्या गरीब-मध्यम शेतकऱ्याचे प्रश्न तरी कोणते ? आज तो मृत्युपंथाला का लागलेला आहे ?
' ग्रामायन 'चे प्रा. वसंत देशपांडे आणि मावळ तालुक्यात लहान शेतकऱ्याला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी भूमी विकास दल संघटित करणारे आबा करमरकर, यांनी स्वानुभवाद्वारे घेतलेला या दारुण वस्तुस्थितीचा शोध ....

चार :

या लहान शेतकऱ्याचे, त्याच्या स्वतंत्र शेतीव्यवसायाचे मरण अटळ आहे.... समाजवादी किंवा सहकारी शेतीचा एखादा पर्यायच त्याला वाचवू शकेल असा एक दावा आहे. तो कितपत खरा आहे ?
प्रा. भगवान बापट यांनी क्रांतीनंतरच्या सोव्हिएत शेतीधोरणांचा आढावा घेऊन, भारतातील सद्यःस्थितीशी या धोरणांचे साम्यविशेष दाखवून केलेली मीमांसा....

माणूस
वर्षारंभ
अंक

## पाच :

या सर्व तात्त्विक चर्चेनंतर मंत्र्यांशी झालेली थोडी बातचीत.... आपले सहकारमंत्री, कृषीमंत्री काय म्हणतात ?

## सहा :

जिथे किसान-कामगारांचे, गरिबांचे, समाजवादी सरकार आलेले आहे, जिथे या सरकारला आपली धोरणे राबवण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी मिळालेला आहे तिथे काय हालहवाल आहे ? पश्चिम बंगालचा दोन आठवड्यांचा दौरा करून, अनेकांच्या भेटीगाठी घेऊन, " चरणसिंगांना अर्थशास्त्र कळत नाही; चरणसिंगांची किफायतशीर धान्यभावाची मागणी ही बड्या ' कुलक ' किसानांची मागणी आहे, " असे म्हणणाऱ्या अर्थमंत्र्याची मुलाखत घेऊन, इतर अनेक सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्यांची नोंद घेताघेता छाया दातार यांनी सादर केलेली खास-

**' पश्चिम बंगाल पुरवणी '**

असा हा सर्व ' माणूस किसान-कामगार ' अंकाचा स्थूल आराखडा आहे.

हा अंक वर्षारंभ अंक म्हणून २ जून १९७९ रोजी प्रसिद्ध होत आहे.

किंमत सुमारे तीन ते चार रुपये. पृष्ठ संख्या सुमारे ६४ ते ७२

या विशेषांकानिमित्त यापुढील आठवड्याचा–दि. २६ मे चा–अंक निघणार नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

१ जूनला प्रसिद्ध होणाऱ्या किसान-कामगार अंकाची मागणी विक्रेत्यांनी लगेच पाठवावी ही विनंती.

# माणूस

## एकोणिसावा वर्षारंभ अंक
## किसान-कामगार विशेषांक

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक एक्कावन्न-बावन्न

१९ मे १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

◘

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

◘

प्रकाशित लेख चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◘

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◘

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

◘

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

◘

मुखपृष्ठ : माधव फळणीकर


# अमळथ्याचे प्रकरण मार्गी लागत आहे

श्री. ग. माजगांवकर यांसी,
स. न. वि. वि.

◘ आपण अमळथ्याहून गेलात व मी शहाद्याला परतलो. दुसऱ्या दिवशी एक पोलीस-ऑफिसर येऊन भेटले. म्हणाले, अमळथ्याचे प्रकरण लवकर संपले पाहिजे. मी त्यांना म्हणालो, आम्हा मंडळींची तीच इच्छा आहे. तेथल्या गरिबांना न्याय मिळावा. तो जेवढा लवकर मिळेल तेवढा चांगला. नाही तर अनेक फाटे या प्रकरणाला फुटतील. त्याची सुरुवातही झाली आहे. साहेब म्हणाले, प्रांत-ऑफिसर या प्रकरणी तुम्हाला भेटू इच्छितात. मी सांगितले, स्वागत आहे. सकाळी हे बोलणं झाले व सायंकाळी प्रांत ऑफिसर आले. मी व छायाताई (कै. अंबरसिंगांच्या पत्नी) त्यांना भेटलो. त्यांनी सुरुवात केली, 'अमळथे प्रकरणात आता फाटे फुटू लागलेले आहेत. तेव्हा त्यातून मार्ग काढला पाहिजे. मी दोन दिवस अमळथ्याला मुक्काम केला. नुकसानभरपाईचे धान्य अठ्ठ्याऐंशी क्विंटल ऐवजी सहाशे क्विंटल तरी व्हावे असा माझा प्रयत्न होता; परंतु जयसिंगराव वगैरे (पाटील) मंडळी त्यावर एक दाणाही द्यायला तयार नाहीत. उत्तमरावांनीही (महसूलमंत्री) त्यांना समजावले; परंतु आता या बाबत ते उत्तमरावांचेही ऐकायला तयार नाहीत.दलितमंडळी धान्य घेत नसतील, तर ते आम्हाला परत करा. त्या धान्याचे पैसे करून आम्ही केस लढवू. अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊ. म्हणून आता धान्य अधिक मिळणार नाही; पण आम्ही जमीन देण्याच्या बाबतीत सहानुभूतीने विचार करू.' मी त्यांना सांगितले, 'हे आपलं म्हणणं मी अमळथ्याच्या लोकांना सांगतो. निर्णय तेच घेतील. ते भरडले गेले आहेत. सहन ते करत आहेत. लढाही तेच देत आहेत. आम्ही त्यांच्या न्याय्य मागण्यांसोबत आहोत.

अमळथ्याबाबतचा निर्णय लवकर करून घेणे आवश्यक होते म्हणून सर्व संबंधितांची सभा शहाद्याला ग्राम स्वराज्य समितीने बोलावली. ता. २९ ला ही सभा झाली. मध्यंतरी कलेक्टर स्वत: अमळथ्याला जाऊन आले. सर्व नासधूस झालेल्या शेतीची त्यांनी पहाणी केली. दलितांशी बोलले. त्या गरिबांनी त्यांना आपली करुण कहाणी सांगितली व ना. उत्तमरावांच्या समक्ष झालेल्या कराराप्रमाणे नुकसानभरपाई व जमिनी मिळाव्यात अशी मागणी केली. कोणाला जमिनी मिळाव्यात त्यांची नावे कलेक्टरनी घेतली व सहानुभूतीने विचार करू असे सांगितले. शहाद्याच्या सभेला आलेल्या त्या अमळथ्याच्या प्रतिनिधींनी कलेक्टरच्या या भेटीची माहिती सभेत सांगितली. प्रांत ऑफिसर यांचेशी झालेली चर्चाही सांगितली गेली. संघर्षवाहिनीने सुरू केलेल्या आंदोलनामुळे काय परिणाम झाले आहेत याचीही चर्चा झाली. सभेला ग्राम स्वराज्य समितीचे कार्यकर्ते, अमळथ्याचे प्रमुख ग्रामस्थ, संघर्षवाहिनीचे शेखर सोनाळकर, धुळ्याचे प्रा. शहा व पुण्याचे श्री. वसंतराव पळशीकर उपस्थित होते.

सभेत गावच्या दलितांनी चिडून सांगितले, 'आम्हाला आता उपासमार असह्य झाली आहे. गावात पन्नास पोलीस आहेत, ते आम्हाला छळत आहेत. आमच्या एका माणसाला त्याच्या घरात घुसून तो भाकर खात असताना ओढून बाहेर काढलं व पकडून शिंदखेड्याला नेलं. किती सहन करायचं? आम्हाला वाटतं बायका-मुलांसह कलेक्टर-कचेरीवर जाऊन धरणं धरावं. अन्नत्याग करावा व मरून जावं!' बैठकीचे वातावरण या निवेदनामुळे अधिक गंभीर झाले. काय करावे चर्चा सुरू झाली. शेखर सोनाळकर म्हणाले, 'मी अमळथ्याला गेलो, आमचे अन्य सहकारी गेले व त्यांनी जी परिस्थिती

पाहिली, त्यामुळे आमच्या संघर्षवाहिनीने ठरवले की, महसूलमंत्री ना. उत्तमराव पाटील यांच्या उपस्थितीत जो करार झाला त्याचे का पालन होत नाही याचा त्यांनाच जाब विचारावा. ठिकठिकाणी असा कार्यक्रम आम्ही हाती घेतला.' ग्रामस्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांनी सुचवले की, असा कार्यक्रम घेऊन प्रश्न अधिक बिकट झाला की सोपा, याचा विचार करावा. याबाबत अन्य प्रश्नाबाबत व पुढच्या लढ्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. निर्णय सर्वानुमते झाला व कलेक्टरना पुढील पत्र लिहिले गेले —

प्रती, ग्रामस्वराज्यसमिती
मा. जिल्हाधिकारी टेकभिलाटी
धुळे जिल्हा यांसी शहादा;
दि. १।५।१९७९

स. न. वि. वि.

◘ अमळथ्याच्या दलित आदिवासी व गरिबांनी गावच्या गुरचरण जमिनीत अतिक्रमण करून केलेल्या शेतीचं नुकसान काही धनिक ग्रामस्थांनी कायदा हातात घेऊन केले, हे आपल्याला माहीतच आहे. ता. २६ डिसेंबर रोजी जनावरे आमच्या शेतीत गेली व सर्व नुकसान केले. शासनाला न जुमानता पीक लुटून नेले. आम्ही याबाबत शासनाकडे तक्रार केलेली आहेच. आपल्याला या सर्व प्रकारची माहिती असेलच. नुकसान झाल्यापासून आम्हा लोकांना काम नाही. त्यामुळे जीवन कठणे कठिण झालं आहे. याबाबत ता. १०–२–७६ रोजी महसूलमंत्री ना. उत्तमराव पाटील यांचे उपस्थितीत अमळथ्याला आम्हाला नुकसानभरपाई पूर्ण देण्याचा तसेच आम्हाला जमीन देण्याचा करार झाला. एक महिन्यात त्याची अंमलबजावणी करायची असे ठरले. एक महिना आम्ही वाट पाहिली व २१।३।७९ रोजी सिंदखेडा तहसील कचेरीवर मोर्चा काढला. नंतर ना. उत्तमराव पाटील यांनी २३।३।७९ रोजी आम्हाला व ग्राम स्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांना मुंबईत वाटाघाटीसाठी बोलाविले. नुकसानभरपाई म्हणून केवळ ८८ क्विंटल द्यायचं बोलणं झालं. नुकसान चारशे क्विंटलच्यावर झालं (त्यामुळे) हे (धान्य) स्वीकारणं शक्य नव्हते. ना. उत्तमरावांनी ता. १० एप्रिलच्या सुमारास इकडे] येतो म्हणून सांगितलं होतं; पण तेही आलेले नाहीत. त्यामुळे आम्हा गरिबांची मोठी कुचंबणा होत आहे याची आपल्याला कल्पना आहेच.

आपण ता. २४ रोजी आमच्या गावाला आलांत. नुकसान झालेली शेतजमीन आपण पाहिलीत. आमच्याशी बोललात; त्यामुळे आम्हाला आनंद झाला. आम्ही आपल्याकडे जमिनीची मागणी केली. आम्ही अनेक वर्षांपासून कसत असलेली जमीन आम्हाला द्यावी व आमचे जे नुकसान झालेले आहे ते भरून मिळावे अशी विनंती केली. आपण या बाबत सहानुभूतीने विचार करणार असाल तर आम्ही या बाबतीत आपल्याशी चर्चा करायला यायला तयार आहोत. आपण ता. २४ ला याबाबत ग्रामस्वराज्यसमितीशी बोलून निर्णय घेण्याचे बोललात. आम्ही व ग्रामस्वराज्य समितीचे कार्यकर्ते एकत्र बसून आपल्या सूचनेवर विचार केला व त्यानंतरच हे पत्र आपल्याला लिहीत आहोत.

आमच्या दोन मुख्य मागण्या आहेत. (१) आम्ही गेली काही वर्षे खंडत असलेली अतिक्रमणाची जमीन आम्हाला प्रत्येकी पाच एकरप्रमाणे मिळावी. (२) आमच्या पिकाचे झालेले नुकसान वाजवी प्रमाणात भरून मिळावे. या दोन मागण्यांची पूर्तता करण्याविषयी आपण सहानुभूती दर्शवलीत हे लक्षात घेऊन आम्ही आपल्याशी बोलणी करण्यास तयार आहोत. आम्ही चार महिने कठीण परिस्थितीत आहोत हे आपण जाणता म्हणून ही बोलणी तातडीने व्हावीत. आमच्या वतीने श्री. बळीराम कोळी, श्रीपत बैसाणे, झोपडू सोनवणे व ग्राम स्वराज्य समितीचे वतीने श्री. छायाताई सुरतवंती, श्री. गोविंदराव शिंदे व उल्हास राजज्ञ हे येतील.

आम्ही गरीब किती दिवस सहन करणार? आपल्याशी बोलल्यानंतर काही होत नाही असे दिसले तर आपल्याकडेच धुळ्याला येऊन बायकामुलांसह धरणे धरून बसण्याशिवाय गत्यंतर नाही. ता. ७ मेपर्यंत आपल्याकडून न्यायाची अपेक्षा करू. त्यानंतर आम्ही सर्व धुळ्याला आपल्याकडे येऊ. ◘

वरील पत्र घेऊन प्रा. मुरलीधर शहा स्वतःच कलेक्टरना भेटले. कलेक्टरनी ता. ५ मेला सकाळी शहाद्याला भेटायची वेळ दिली. बोलणी फिसकटली तर ता. १४ पासून कलेक्टरकचेरीवर धरण्याचा कार्यक्रम आयोजित करावयाचा व न्याय मिळेपर्यंत लढा चालू ठेवायचा असा निर्णय सभेत घेतला गेला.

कलेक्टरना लिहिलेल्या पत्रामुळे हालचाल सुरू झाली. ना. उत्तमरावानाही माहिती दिली गेली असणार. ता. ४ रोजी ना. उत्तमराव धुळ्याला होते. त्यांनी पत्रकारपरिषदेत घोषणा केली, अमळथ्याला वीस भूमिहीनांना प्रत्येकी तीन एकर जमीन देणार. मुख्यमंत्री निधीतून त्यांना साधने देणार. ता. ५ च्या सकाळच्या स्थानिक वृत्तपत्रात ही मुलाखत छापून आली होती. कलेक्टरसाहेबांशी चर्चा करताना त्यांना हेच सांगितले की, वीस भूमिहीनांना प्रत्येकी तीन एकर जमीन देण्यात येईल. त्याची अधिक माहिती विचारता ते म्हणाले, 'मुंबईत आपण चर्चा करत असताना जमीन देणयोग्य नऊ नावे निश्चित करण्यात आली होती. मी नुकताच अमळथ्याला गेलो असताना तेथील दलितमंडळींना आणखी पाच नावे दिली. म्हणजे चौदा लोक झाले. गेल्या वर्षी सात लोकांना प्रत्येकी दोन एकर जमीन दिलेली आहे. त्यांना आणखी एक एकर जमीन दिली जाईल. असे सर्व एकवीसजण होतात. त्यापैकी एकाकडे जमीन आहे असे कळले. म्हणून वीस भूमिहीनांना एकूण साठ एकर जमीन मिळेल. गावकऱ्यांनी सांगितले, 'ती भूमिहीनच आहे.' त्यावर कलेक्टरसाहेब म्हणाले, 'तसे असेल तर त्यालाही जमीन मिळेल.' मुख्यमंत्रीनिधीतून साधने मिळतील असे उत्तमरावांनीच जाहीर केले आहे. ती किती मिळतील व केव्हा मिळतील? त्यावर उत्तर मिळाले, 'मला त्याची माहिती नाही. मी माहिती घेऊन सांगतो. जमिनी मात्र आम्ही लगेच देऊ. नुकसानभरपाईचा अधिक आग्रह नको. जे जमा झाले आहे ते घ्यावे.' केसेसबाबत कलेक्टरना विचारता त्यांना सांगितले, 'केसेस दोन्ही बाजूच्या चालू रहातील.'

कलेक्टरच्या भेटीनंतर सर्वजण ग्रामस्वराज्य समितीचे ऑफिसवर बसले व आता काय करावे यावर सविस्तर चर्चा झाली. गावचे लोक म्हणाले, 'वीसच लोकांना जमीन

मिळत आहे. ना. उत्तमरावांनी सांगितले होते प्रत्येकी पाच एकर जमीन देऊ. तीन एकरच देत आहेत. नुकसानभरपाई अधिक मिळत नाही.' कार्यकर्त्यांनी सुचवले मिळतंय ते घ्यावे व मिळायला पाहिजे त्यासाठी झगडत रहावे. सर्वांनी हा विचार मान्य केला. कलेक्टरना दुसऱ्या दिवशी छायाताई व ग्रामस्थांनी भेटून हा विचार सांगावा व जमिनी लवकर मिळतील हे पहावे.

असे हे अमळथे प्रकरण मार्गी लागत आहे. प्रत्यक्ष त्या गरीब लोकांच्या पदरात केव्हा पडते पहायचे. या प्रकरणात आपण समक्ष येऊन पहाणी केलीत व 'माणूस'मधे लिहिलेत. त्यामुळे सर्व महाराष्ट्राला ते माहीत झाले. शिदखेड्यात ग्रामस्वराज्य समितीने या वर्षी प्रवेश केला. गावोगाव आम्ही कार्यकर्ते हिंडलो. शहाद्यात जमीनदार गुजरमंडळींशी तेथील गरिबांना झगडा द्यावा लागला. तेथला धनिक गुजर समाज व शिदखेड्यातला धनिक पाटील समाज या दोन समाजांच्या मनोवृत्तीत फरक खूप जाणवला. शिदखेड्यात सरंजामदारी प्रवृत्ती जास्त आढळली. त्यांना जाण यायला वेळ लागेल असे दिसते. अमळथ्याला आक्रमक पवित्रा घेतला गेला तीच परिस्थिती अनेक गावांत आहे. अमळथ्याचे गरीब लोक संघटित झाले व त्यांनी आपल्यावरील अन्यायाविरुद्ध संघटित प्रतिकार केला. त्यामुळे त्या भागात मोठा वचक बसला व धनिक लोक अन्याय करायला धजावले नाहीत. आमच्या त्या भागातल्या मोठमोठ्या सभांनी व मोर्च्यांनी हे काम केले.

अमळथ्याच्या गरिबांनी मोठ्या धार्यीची झुंज दिली आहे. गावात ते लोक थोडे. धनिकांनी त्यांच्यात फाटाफूट करून काही मंडळींना आपल्या बाजूस करून घेतलेले. मी प्रथम त्या गावात गेलो त्या वेळी लक्षात आले, गरिबांत फाटाफूट आहे. मी त्यांना सांगितले, 'तुमच्यावर झालेल्या अन्यायाची दाद मिळायला पाहिजे असेल तर तुम्ही सर्व एक झाले पाहिजे.' कारण आपल्या बाजूला करून घेतलेल्यांची नासधूस धनिकांनी केली नव्हती. आज यांची केली, उद्या आपली होईल हे गरिबांनी जाणले व आपला संघटित मोर्चा त्यांनी उभारला. मोठ्या दिव्यांतून त्यांना जावे लागले. उपासमार, अवहेलना, तुच्छता, मारपीट त्यांना सहन करावी लागली; परंतु त्यांनी आपली एकी अभंग ठेवली.

अमळथ्याच्या लोकांना काम नाही म्हणून त्यांनी कामाची मागणी केली. रोजगारहमीचा कायदा केलेल्या महाराष्ट्र सरकारला त्यांचेसाठी चार महिन्यांत काम देता आले नाही. बंडिंग, रस्त्याच्या कडेला झाडे लावणे, खडी तयार करणे आदी कामे देता आली असती. हे तत्परतेने व्हायला हवे होते. गरिबांकडे सरकार कसे लक्ष देत आहे हे प्रत्यक्ष पहायला मिळाले.

या प्रश्नाकडे दलितनेत्यांनी, कार्यकर्त्यांनी लक्ष दिले नाही हे आपण आपल्या लेखात लिहिले आहे. एवढे पक्ष आहेत त्यांनी तरी काय केले? अमळथ्याच्या गरिबांचे नुकसान करणारेच मुळी जनता पक्षाचे. म्हणून मी जनता पक्षाच्या जिल्हा-नेत्यांनाच अमळथ्याला घेऊन गेलो. झाले ते वाईट झाले असे म्हणण्यापलीकडे त्यांनी काही केले नाही. दलितनेते जिल्ह्यात येऊन गेले. त्यांना अमळथ्याला जायला सवड झाली नाही. शिदखेडे तालुक्यात एकाही गावात शेतमजूर किमान वेतन कायदा लागू नाही. एक महिन्यापूर्वीपर्यंत बी. डी. ओं. नी व या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी काही केले नव्हते. आमचा शिदखेड्याला मोर्चा गेला तेव्हा तहसीलदारांनी एक महिन्यात अंमलबजावणी होईल असे करतो, असे आश्वासन दिले. ही परिस्थिती पक्ष-कार्यकर्त्यांना माहीत नाही असे थोडेच आहे? त्या भागात हिंडताना सभांतून आम्ही आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींकडे गेलेल्या परत मिळतात, तसा कायदा आहे याची माहिती देत असू. मग अनेकजण आपल्या जमिनीची प्रकरणे घेऊन येऊ लागले. अजून त्या भागातल्या आदिवासींच्या जमिनी परत मिळावयाच्या आहेत. काम मोठे आहे. ते करणारे समर्पित कार्यकर्ते गावोगाव निर्माण व्हायला पाहिजेत, तरच अमळथ्यासारख्या प्रकरणांना आळा बसेल.

—गोविंदराव शिंदे


# टॉलस्टॉय — एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# ग्रामीण साहित्यिकांचा मेळावा

माझी एक आत्या होती. लहान मुलांना तिचा फार लळा. पाळण्यांतील बाळाशी सुद्धा तिची मैत्री होई. पाळण्याशी उभं राहून ती बाळाशी अर्धा तास बोलत राही. तिचं बोलणं कळून की काय ते बाळही जोरजोरानं खिदळत हातपाय हलवी. बाळाचा आनंद पाहून आत्याच्या तोंडावर आनंद ओसंडू लागे; पण क्षणात मधेच ती उदास होई. शेजारी असलेल्या समवयस्क बाईला म्हणे, 'वहिनी ! बाळ आता उपडं वळायला लागेल आणि नाक आपटून घेईल, हात अंगाखाली सापडेल आणि कळवळून रडेल. मग बाळ रांगायला लागून ढोपरं फोडून घेईल. मग चालायला पाहील आणि पडेल. मग शाळेत जाऊ लागेल, मुलांशी मारामाऱ्या होतील, अभ्यासासाठी आईची बोलणी खाईल. दरवर्षी पास होताना रात्र रात्र जागेल. शिक्षण झालं की नोकरी. मग लग्न की जुपला संसाराला. वहिनी ! कशाला ग हे करीत राहायचं सगळ्यांनी ? मुलं एकदम मोठी का होत नाहीत ?

ग्रामीण साहित्यिकांच्या दुसऱ्या मेळाव्यास गेलो असता समोर बसलेल्या ग्रामीण साहित्यिकांकडे पाहताना मला आनंद वाटला आणि आत्यासारखा उदासही झालो. माझ्या मनात आलं, आम्ही जुने लेखक ज्यातून गेलो त्यातून या सर्वांना जावयाचे आहे. दिवसभर पोटाची कामे करून रात्री तीन-तीन वाजेपर्यंत जागत लिहावयाचे आहे. कथा-कविता जे काही होईल ती संपादकाकडे पाठवून रोज धडधडत्या छातीने उत्तराची वाट पाहावयाची आहे. ती प्रसिद्ध झाली की वाचकांकडून येणाऱ्या प्रत्येक बऱ्या-वाईट शेऱ्याचे सुखदुःख अनुभवावयाचे आहे. मग दुसरी कथा-कविता लिहून झाल्यावर लेकीसारखी तिची चिंता करीत बसावयाचे. मग अशा काही कथाकविता झाल्यावर त्यांचा संग्रह कसा निघेल याची काळजी लागावयाची आणि संग्रह प्रसिद्ध झाला की, अभिप्रायांकडे डोळे लावून बसावयाचे आणि एवढे होऊन थोडे नाव मिळाले तर तो नाद चिकटून त्यापायी आर्थिकदृष्ट्या मागे पडल्याने मित्रपरिवाराचा हेटाळणीचा विषय व्हावयाचे; हे सर्व आत्यासारखे माझ्या मनात येऊन मला विचारावेसे वाटले, 'लेखक एकदम मोठा का होत नाही ? प्रत्येकाला हा खटाटोप कशाला ?'

दुसरा ग्रामीण साहित्यिक मेळावा पुण्यातील भारती विद्यापीठाच्या ग्रामीण विकास प्रतिष्ठानतर्फे व विचार भारती यांच्या विद्यमाने भारती विद्यापीठाच्या प्रांगणातच दिनांक पाच मे व सहा मे या दोन दिवशी भरला होता. मेळाव्याचे संयोजक व निमंत्रक होते, सुप्रसिद्ध कथाकविता व कादंबरीकार आनंद यादव व प्रा. राम शिंदे. उद्घाटक सुप्रसिद्ध कथाकार ग. ल. ठोकळ आणि अध्यक्ष होते, श्री. पतंगराव कदम. पहिल्या दिवशी डॉ. कु. सरोजिनी बाबर, श्रीमती शांता शेळके यांनी व दुसऱ्या दिवशी प्रा. गं. बा. सरदार, डॉ. आनंद यादव व प्रा. द. ता. भोसले यांनी वेगवेगळे विषय घेऊन भाषणे केली. दि. सहा मे या दिवशी दुपारी तीन ते सहा खुली चर्चा होती. यात ग्रामीण लेखकांचे स्वानुभव-कथन व साहित्यविषयक येणाऱ्या वैयक्तिक अडचणी या संदर्भात सूचना व उपाय या गोष्टी होत्या.

या कार्यक्रमाला मी गेलो होतो. तिथे आलेल्या पाहुण्या वक्त्यात डॉ. ताकवले, डॉ. वि. भा. देशपांडे, श्री. सरिता पदकी, श्री. पद्मा गोळे व प्रपंचचे माधव कानिटकर होते. समोर पन्नास ग्रामीण साहित्यिक बसले होते. अगदी लहान खेड्यांतून सुद्धा त्यातले काही आले होते. या होतकरू लेखकांना काल व आज मिळून थोरथोर साहित्यिकांचे मार्गदर्शन मिळाले होते. मला त्यांचा हेवा वाटला. मोठ्या लेखकांकडून दर वेळी उत्तेजन मिळते असे नाही. माझा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला होता. अनंत काणेकरांकडे मी अधूनमधून जात असे. माझा संग्रह प्रसिद्ध झाल्याचे मी त्यांना उत्साहाने सांगितले. तेव्हा समोरच्या काचेच्या कपाटाकडे त्यांनी बोट केले. तेथे त्यांची पुस्तके व्यवस्थित लावून ठेवलेली होती. ती दाखवून काणेकर म्हणाले, 'ही माझी पंधरा पुस्तके झाली आहेत, काय मिळाले मला ? लेखनात काही नाही !'

माझा होतकरूपणाचा उत्साह पाहून काणेकरांनी माझी गम्मत केली असेल किंवा मला अजून किती यातायात करावयाची आहे हे मनात येऊन माझ्या आत्यासारखा त्यांना उदासतेचा झटका आला असेल. अर्थात त्यांचे मी ऐकले नाही व लिहीत राहिलो ते वेगळे आणि आत्ता माझ्या मनात येताय की लेखनात काही अर्थ नसेल तर काणेकरांनी आपली पुस्तके शोकेसमध्ये बाहेरच्या खोलीत का लावून ठेवावी ?

मुद्दा हा की, माझ्यासमोरच्या ग्रामीण कथाकारांना असा धक्का बसणार नाही. डॉ. आनंद यादवांसारखे समर्थ लेखक त्यांना प्रोत्साहन देण्यास उभे आहेत ग्रामीण वाङ्मय केव्हा सुरू झाले याचा मी कधी कधी विचार करतो. जेव्हा नागरी लेखक या वाङ्मयातून बाजूला झाला तेव्हा ग्रामीण वाङ्मय सुरू झाले. ग्रामीण वाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीने ते अपरिहार्य होते. हा विकास इतका झाला की, पूर्वीचा नागरी लेखक ग्रामीण होता होता, ग्रामीण लेखक नागरी होत असलेला दिसू लागला आहे. शहरातील ग्रामीण लेखकांची संख्या वाढत आहे. आज चाललेली ही सरमिसळ लक्षात घेता ग्रामीण व नागरी या दोन्ही भेदांतील सीमारेषा लौकरच्या भविष्यात पुसली जाईल अशी खात्री वाटते. असे वाटण्याचे कारण तेथे काही कवींनी नागरी विषयाची कविताही केल्याचे लक्षात आले. या ग्रामीण साहित्यिकांच्या मेळाव्यात शक्य तो ग्रामीण विषय घ्यावा असे सुचविण्यात आले, त्यामुळे त्यांचे वाचन झाले नाही इतकेच.

आरंभी डॉ. देशपांडे यांनी, ग्रामीण लेखक ग्रामीण वाङ्मयात उपेक्षित अशा नाट्य-लेखनाकडे वळतील अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यावर चर्चा झाल्यावर डॉ. प्रभाकर

ताकवले यांनी 'मी ग्रामीण भागाशी तसा संबंधित नाही' अशी सुरुवात करून, 'तुम्ही ग्रामीण साहित्य अधिक खोल जगवलं पाहिजे असे सुचवून काही ग्रामीण शब्दांचे अर्थ विचारले. मोरके, पांढरा, टेकणा, डांभेखीळ, नराणी वगैरे. बहुतेकांना त्याचे अर्थ सांगत आले. त्याचा आपल्याला फार आनंद वाटला. 'ग्रामीण लेखकांनी व्यक्तिचित्राकडे वळावे म्हणजे ते कुठेही छापता येईल' असे त्यांनी शेवटी सुचविले. ग्रामीण लेखकांना, आपले कुठे छापले जाईल, आपल्याला पैसे मिळतील का? या प्रश्नांवरून 'प्रपंच'चे माधव कानिटकर म्हणाले, 'खऱ्या ग्रामीण कथा आमच्याकडे येतच नाहीत. मराठी नागरी कथा प्रेमाच्या त्रिकोणात सापडली होती तशी ग्रामीण कथा 'भानगडीं'त सापडली. त्यांतून बाहेर पडण्याचा यत्न यादवांनी केला. त्यांनी आणखी एक मुद्दा काढला 'ग्रामीण वाचक आहेत कुठे?' पण तरीही ग्रामीण साहित्यिकांसाठी आपला एक अंक काढण्याचे त्यांनी वचन दिले.

वाचकांचा प्रश्न सर्वच साहित्याला अनाकलनीय असतो. 'नाखवा वल्हव वल्हव' हे काणेकरांचे कोळीगीत कोळ्यांना ठाऊकीही नव्हते. ज्यांनी समुद्र किंवा मासा किंवा जाळे पाहिलेही नव्हते अशा नागरी तरुणींत ते तोंडपाठ होते. आजही ग्रामीण भागात नागरी चित्रपटांतील गाणी पाठ दिसतील. तेव्हा ग्रामीण लेखकांनी नागरी साहित्य लिहावे व नागरी लेखकांनी ग्रामीण साहित्य लिहावे हेच रास्त दिसते.

आपण कुठे कुठे कथा–कविता पाठवतो, त्या मासिकांकडून येणारे व त्या मासिकांविषयीचे आपले अभिप्राय ग्रामीण साहित्यिकांनी सांगितले. सत्यकथेबद्दल एक लेखक म्हणाला की, सत्यकथेकडे साहित्य धाडीत राहिलं तर पंधरावीस वर्षं थांबावं लागेल. 'तुमच्या कवितेत जरा 'हे 'हवं आहे म्हणून परत पाठवीत आहोत' असे त्यांचे उत्तर येते. 'किर्लोस्कर, स्त्री' यांत 'भाव' असलेले लेखक असतात असा अभिप्राय एकाने व्यक्त केला. 'मेनका, रंभा' यांत बा. भ. पाटील येतात. 'माणूस'ची' प्रथा मात्र वेगळी आहे. ते कथा छापतात; पण त्यावर आलेली पत्रेही छापतात. यावरून ग्रामीण लेखकांना वेगवेगळ्या मासिकांविषयी काय वाटते हे कळले. ते आपल्या कथा-कविता कुठे धाडतात हेही कळले. लेखकांची शहराकडे ओढ आहे यांत शंका नाही. खेड्यांतील सर्वांचीच ही ओढ आहे. 'ती आपणास वळवून तोंडे खेड्याकडे करावयाची आहेत.' असे आनंद यादव म्हणाले; पण 'माणूस'चे माजगावकर यांच्या समवेतच्या पदयात्रेत एका खेड्यांतील वृद्धाने आम्हाला सांगितले ते सर्वत्र खरे आहे. या वृद्ध कार्यकर्त्याने अनेक खटपटी करून आपल्या छोट्या खेड्यांतून शंभर ग्रॅज्युएटस्, दोनशे एस. एस. सी. अशी मुले शिकवली; पण त्यातला एकही येऊन मला म्हणाला नाही, 'तात्या! मी शहरातल्या नोकरीचा मोह सोडून आपली शाळा चालवतो.' आम्हाला आमच्या शाळेसाठी बाहेरून शिक्षक आणावे लागतात! असे उद्वेगाने तो म्हातारा म्हणाला. ही जी पदवीधरांची प्रवृत्ती तीच ग्रामीण लेखकांची. त्यांचे पाऊल खेड्यांत ठरतच नाही. पहिली संधी मिळताच ते शहरात येतात. मग वर्षांतून एकदा गावी जाणे एवढाच त्यांचा स्वतःच्या खेड्याशी संबंध राहतो. पुढे पुढे त्यांच्या कथा त्यांच्या मनातील खेड्यांच्या राहतात. या लेखकांचे सुदैव हे की, ते 'एस्टॅब्लिश' झालेले असतात. परिस्थितीच्या लढाईत ते जिंकलेले असतात; पण त्यांचे लेखन थांबते किंवा कस उतरतो, तिथे ते हरतात. या सगळ्या गोष्टी सांगण्याचे कारण ग्रामीण साहित्यिकांना यावरूनही शिकता येईल.

◻

आतापर्यंत शहरात राहणाऱ्या ग्रामीण लेखकांशी माझा बराच संबंध आला. त्या मानाने खेड्यांतील ग्रामीण लेखकांशी कमी आला. आमच्या खेड्यातला एक तरुण आमच्या गावातील लोहार वगैरेंवर एक कादंबरी लिहीत होता. त्याच्या मागोमाग आम्ही मुले हिंडावयाचो. त्याची कादंबरी पुरी झाली असती तर ती मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी ठरली असती; पण योग नव्हता. तो लोहार गाव सोडून शहरात गेला. दुसरा ग्रामीण लेखक भेटला तो 'माणूस'च्या माजगावकरांनी काढलेल्या पदयात्रेत. अगदी लहान गाव होते. परिसर सुंदर होता. तिथे एक मुलगा खूप लिहीत होता. त्याने आपली काही कथा व कादंबरी वाचावयास दिली. त्यानेच सांगितले की, लेखनाच्या नादामुळे आपण नापास होत आहोत. साहित्याची प्रचंड हौस. एका छोट्या कपाटात त्याने वाचनालय उघडले होते. मुली जशा बाहुल्यांचा संसार मांडतात तसा तो साहित्याचा संसार मांडत होता. फक्त तो त्याचा खेळ नव्हता. तो आमच्याबरोबर पुढच्या दोन गावी चालत आला. एका मुक्कामात त्यानं आम्हाला उकडलेली अंडी आणून दिली.

खेड्यांतून शक्ती वाया जातात, बुद्धी अगतिक होतात, या मुलासाठी मला काही करणे शक्य नव्हते.

'तरुण भारत' दैनिक कथा-स्पर्धा लावते त्या निमित्तानेही गेली दोन वर्षे ग्रामीण साहित्याशी माझा संबंध आला. या स्पर्धेचा मी एक परीक्षक होतो. या वर्षी सहाशे कथा आल्या होत्या. कथा धाडणारे बहुसंख्य लहान गावांतले होते. त्यांच्या कथांचे विषयही विविध होते. त्या सर्व कथा मिळून खेड्यांत आज काय विचार व कल्पना चालतात याचे उत्तम चित्र उभे राहिले होते. या कथांचा अभ्यास करून ग्रामीण साहित्याविषयी काय करायला पाहिजे याचा शोध घेता येईल, असे मला वाटते. काही नाही तरी प्रा. बोधे यांच्यासारखा एक लेखक आम्हाला त्यात मिळाला हे फार साधले. गेल्या वर्षी त्यांची कथा सर्वोत्कृष्ट ठरली. यंदाही त्यांची

कथा उत्तम होती. त्यांची कथा वाचताना ती ग्रामीण आहे याचे भान रहात नाही. कोणतीही चांगली कथा अशा भेदाभेदाच्या पलीकडे जाते.

ग्रामीण साहित्याच्या मेळाव्यांची जरूर असली तरी त्याबाबत फार जपून पावले टाकायला हवी असे वाटते. या मेळाव्यांतून आणखी काही नवे संताप उगीचच उद्भवू नयेत, याची काळजी घ्यायला हवी. सरिता पदकी यांनी 'या मेळाव्यात ग्रामीण स्त्री साहित्यिक का नाहीत? त्यांचा आवाज का नाही?' असा प्रश्न विचारून जरा खळबळ उडवली. एका ग्रामीण साहित्यिकाने कळवळून म्हटले, 'आमच्या लेखिकेंचा आवाज आम्ही बंद केलाय.' खेड्यातील स्त्री पहाटेपासून रात्रीपर्यंत कशी राबत असते याचे वर्णन एकानं केलं. आनंद यादव म्हणाले, ती स्त्री इथं नाही याचं कारण गुंतागुंत. ग्रामीण जीवन फार गुंतागुंतीचे. मी रीडर आहे. माझ्या सगळ्या बहिणी अशिक्षित आहेत. मला बारा भावंडे आहेत. अकरा जणांची ट्रॅजेडी आहे. येथील सगळी मंडळी फार गरिबीतून आलेली आहेत. 'ग्रामीण स्त्रीच काय पण पुरुषही बोलत नाही.'

आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्य हे जातीचे नाही असे म्हटले तेही बरोबर होते. फक्त दलित साहित्य हे जातीचे असे पुसट विधान त्यांनी केले ते बरोबर नव्हते. त्यांनी असे म्हणावयास हवे होते की, साहित्य हे या सर्व भेदांच्या वर जायला हवे. उत्तम साहित्य दलित, ग्रामीण की नागरी हा विचार करीत नाही.

□

हे सर्व वाचून एक गोष्ट लक्षात येईल की, ग्रामीण कथा म्हणजे 'पचक थू' कथा असा जो एक हलका समज नागरी वाचकांत झाला आहे तो चूक आहे. ग्रामीण साहित्याचा नागरी साहित्यासारखाच खोल विचार करता येतो, हे लक्षात येईल. आतापर्यंतचे दोन मेळावे पुण्यात भरले. यापुढे हे मेळावे वेगवेगळ्या खेड्यांत घेण्याचा यत्न व्हावा म्हणजे ग्रामीण स्त्रीला या मेळाव्यात भाग घेता येईल. हे सर्व होत असता नागरी, ग्रामीण, दलित सर्व साहित्य मराठी संपूर्ण साहित्याचीच अंगे आहेत हे विसरले जाऊ नये. □

# रशिया-चीन

## संघर्षाकडून समझोत्याकडे

वा. दा. रानडे

रशियासंबंधी चीनच्या धोरणात काही बदल होत आहे काय? रशियाशी संघर्ष सुरू झाल्यापासून रशियाविरोध हाच चीनच्या धोरणाचा केंद्रबिंदू झालेला आहे. रशिया आपल्याशी युद्ध करणार हे गृहीत धरून रशियाविरोधी राष्ट्राशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध चीनने वाढविले. जपानशी शांतता, तर अमेरिकेशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणे, आशियातील राष्ट्रांशी सहकार्याचे संबंध वाढविणे, भारताशी संबंध सुधारण्यासाठी वाटाघाटींची तयारी दर्शविणे या साऱ्या घटना याच उद्देशानुसार झालेल्या आहेत.

रशिया व चीन यांच्यात १९५८ साली झालेल्या मैत्रीकराराची मुदत पुढच्या वर्षी संपते. हा करार गेली काही वर्षे केवळ कागदावरच राहिलेला असून मुदत संपताच किंवा त्यापूर्वीही चीन तो एकतर्फी रद्द करील अशा बातम्या काही महिन्यांपूर्वी आलेल्या आहेत; पण गेल्या एक-दीड महिन्यातील घडामोडी वारे निराळ्या दिशेने वाहू लागल्याच्या सूचक आहेत. गेल्या ३ एप्रिलला रशियाशी मैत्रीकराराची मुदत वाढविण्याचा आपला विचार असल्याचे चीनने जाहीर केले. त्याच वेळी अनिर्णित प्रश्नांवर रशियाशी नव्याने वाटाघाटी सुरू करण्याची तयारी चीनने दर्शविली. रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांनी मॉस्कोतील चिनी वकिलास पाठविलेल्या खलित्यात वाटाघाटी कोणत्या पातळीवर होणार, कोठे होणार वगैरे तपशील विचारला. वाटाघाटींची सूचना रशियानेही फेटाळून लावलेली नाही असे यावरून दिसते. चीनने आता चीनमधील रशियन वकिलाकडे एक खलिता पाठविला असून राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक संबंधांबाबत करावयाच्या वाटाघाटींचा तपशील कळविला आहे आणि सरकारांच्या संबंधात असलेल्या सर्व मूलभूत प्रश्नांवर बोलणी करण्याची तयारी दर्शविली आहे.

तीन एप्रिलला चीनने पाठविलेल्या खलित्याचा एक विशेष म्हणजे वाटाघाटी सुरू करण्यासाठी चीनने कोणत्याही अटी घातलेल्या नाहीत. यापूर्वी वाटाघाटींची शक्यता जेव्हा जेव्हा दिसली त्या प्रत्येक वेळी वादग्रस्त भागातून रशियाने आपल्या फौजा काढून घेतल्या पाहिजेत अशी अट चीनने घातलेली होती आणि दोन देशांच्या दरम्यान वादग्रस्त टापू असल्याचे अमान्य करून रशियाने ही अट मान्य करण्यास नकार दिला होता.

यापूर्वी ९ मार्च १९७८ ला म्हणजे एक वर्षापूर्वी चीनने रशियाला पाठविलेल्या पत्रात इतर अटींच्या जोडीला रशियाने मंगोलियातून फौजा काढून घेण्याची नवी मागणी केलेली होती; पण या वर्षी ३ एप्रिलला व नंतर पाठविलेल्या कोणत्याही पत्रात कोणत्याही अटींचा उल्लेख नाही.

पॅरिसमधील ल माँदे या फ्रेंच पत्राचे पेकिंगमधील वार्ताहर ॲलन जॅकब यांनी अलीकडेच लिहिलेल्या एका लेखात म्हटल आहे की, चिनी नेते आपल्या खाजगी संभाषणातून रशियाशी संवाद साधण्याबाबत अधिक मोकळेपणाने बोलतात, अमेरिकेशी आम्ही सुरळीत संबंध प्रस्थापित केले, जपानशी शांतताकरार केला, पश्चिम युरोपातील देशांशी आमचे चांगले संबंध आहेत, भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनाही आम्ही पेकिंगला बोलावले होते तेव्हा रशियाशी वाटाघाटी का सुरू करू नयेत असा त्यांचा प्रश्न असतो; पण ही आपली वैयक्तिक मते आहेत हे स्पष्ट करायला ते विसरत नाहीत.

या संबंधात आणखी काही घटनांकडे ल माँदेच्या बातमीदाराने लक्ष वेधले आहे. रशिया-चीन-मैत्रीचा करार १९५० साली झाला. त्या वेळी रशियात असलेले चीनचे वकील वँग जियाझियांग यांचे राजकीय पुनर्वसन करण्यात आले आहे. मैत्रीकरार घडवून आणण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. प्रतिगाम्यांशी समझोता करण्याच्या सूचना मांडल्या असा आरोप सांस्कृतिक क्रांतीच्या काळात त्यांच्यावर करण्यात आला

पृष्ठ २० वर

# मुक्ताफळे

ग्यानबा

## □ राजांची रात्र आहे, वैऱ्यांनो जागे रहा !

'बहुसंख्य हिंदुधर्मीयांनी व्यापिलेल्या भूभागावर परधर्मीय मुसलमानांची सत्ता पसरलेली असताना तेथे हिंदु छत्रपतीचे स्वतंत्र राज्य शिवाजीमहाराजांनी स्थापिले. ही महाराजांची कामगिरी हिंदुसमाजाच्या संघटनेला पोषक झाली.' (पृ. २४०)
—ले. दि. वि. काळे, 'छत्रपति शिवाजीमहाराज' प्रकाशक : 'पुणे विद्यापीठ'

शिवाजीमहाराजांचे चरित्र हे हिंदुसंघटनेला पोषक ठरणारे चरित्र आहे, यात आम्हाला शंका नाही. श्री. दि. वि. काळे यांनी लिहिलेल्या छत्रपती शिवाजीमहाराज या पुस्तकाच्या आवृत्यांमागून आवृत्या छापून पुणे विद्यापीठ त्या गेली कित्येक वर्षे विकीत आहे, ही गोष्ट लोकांना माहीत नसेल. गेल्या आठवड्यात शिवशाहीर ब. मो. पुरंदरे यांचा पुण्याच्या 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या पटांगणात जो प्रचंड जाहीर सत्कार करण्यात आला, त्या प्रसंगी बोलताना पु. ल. देशपांडे म्हणाले—

'शिवशाहिरांना पुणे विद्यापीठाने डॉक्टरेट देऊन त्यांचा सन्मान करावा!'

रुपये दोन लाख एक्कावन्न हजाराची थैली शिवशाहिरांना अर्पण करून पु. ल. म्हणाले—

'बाबासाहेबांनी शिवचरित्रकथनावर लाखो रुपये मिळवले आणि 'इदं न मम' म्हणून ते समाजाला दिले. एका संशोधकाने, वक्त्याने आणि कलावंताने लाखो रुपये मिळवून ते समाजाला उदात्त विचारे दिल्याचे इतके मोठे दुसरे उदाहरण भारतात नाही...'

लाखो रुपयांचे दान आणि शिवशाहिरांना लोकांनी दिलेली थैलीची रक्कम लक्षात घेता, कित्येक लाख लोकांना शिवशाहिरांनी हिंदुसंघटनेला पोषक ठरणारे महाराजांचे चरित्र कथन केले असेल याची कल्पना येते. पु. लं. ची सूचना असल्याने, शिवचरित्र विकणारे पुणे विद्यापीठ बाबासाहेबांना कदाचित 'डी लिट्' पदवी देईलसुद्धा !

आणि याचमुळे आम्ही अस्वस्थ झालो आहोत.

थैली-समर्पणानंतर दीडशे कलाकारांनी शिवराज्यारोहणाचा सोहळा साजरा केला. महाराजांना राज्याभिषेक झाला. अपरात्री तोफांचे वाटावे असे कानठळ्या बसणारे आवाज पुणे शहरात दुमदुमले आणि झोपमोड होऊन आम्ही जागे झालो. तेव्हापासून आम्हाला झोप कशी ती नाही !

लोकशाहीच्या आणि निधर्मी संघटनेच्या चालू काळात, महाराजांचे चरित्र ऐकायला लाखो लोकांनी गर्दी करावी आणि राज्यारोहणाचे सोहळे पहाण्यासाठी लोकांनी जागरणे करावीत हे आम्हाला अस्वस्थ करणारे आहे.

आम्ही नुकताच एक विद्वत्तापूर्ण लेख वाचला. 'भारतीय संविधानाचे मूलभूत तत्त्व म्हणजे निधर्मी राज्य. ही संकल्पना गेल्या काही दिवसांत ज्या गोष्टी घडल्या त्यामुळे पराभूत होणार की काय अशी शंका येऊ लागली आहे.' अशी प्रस्तावना करून या विद्वानांनी लिहिले आहे— 'या तीन घटना म्हणजे खा. त्यागी यांनी धर्मांतरवादासंबंधी मांडलेले विधेयक, जनता सरकारने नेमलेल्या आयोगाने अलिगड विद्यापीठासंबंधी केलेली शिफारस आणि आचार्य विनोबा भावे यांनी गोहत्याबंदीसाठी उपोषणाने आणलेले दडपण.'

या तिन्ही घटनांमागे 'हिंदुत्व जपण्याची प्रेरणा आहे' आणि यामुळे पूर्ण निधर्मी राज्याच्या नेमक्या उलट दिशेने आपला प्रवास चालू झाल्याची शका विद्वानांनी व्यक्त केली आहे.

आपल्या या तीन घटनांपेक्षाही शिवशाहीर ब. मो. पुरंदरे यांनी चालविलेल्या शिवचरित्रकथनाचा भाषणयज्ञ हा अधिक आक्षेपार्ह वाटतो. कारण सबंध शिवचरित्र हे पुणे विद्यापीठ प्रकाशन म्हणते त्याप्रमाणे हिंदुसंघटनेला पोषक चरित्र असले तरी ते वाचणाराला; पण बाबासाहेब हिंदुत्व जपण्याच्या प्रेरणेची ही पोथी गावोगाव सांगत सुटले आहेत हे अधिक धोकादायक आहे !

लोकशाहीचा वा आधुनिकतेचा संदर्भ नसलेले हे शिवचरित्र महाराष्ट्रात लाखो माणसांनी सतत ऐकावे याचा आम्हाला विस्मय वाटतो. निधर्मी भावना आणि लोकशाहीचे प्रेम यांना पोषक नसलेले हे चरित्रगान थांबवणे कुणाच्या हातात नाहीच का? मधु लिमये, शांती नाईक यांनी संशोधन केले, इतिहास चाळला तर त्यांना या उद्योगामागे त्यांचा लाडका हात निश्चित दिसेल अशी आम्ही त्यांना ग्वाही देतो. पुण्यातून निवडून गेलेल्या शांती नाईक तुम्ही स्वस्थ कशा ?

आमच्याप्रमाणेच असंख्य विद्वान शिवशाहिरांच्या या उद्योगाबाबत सचिंत आहेत याची आम्हाला कल्पना आहे; परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पु. लं. प्रमाणेच आता काही विचारवंतांनाही शिवशाहिरांचा हा उद्योग आक्षेपार्ह वाटत नाहीच, उलट तो गौरवास्पद वाटतो. आम्ही मोठ्या आशेने सुप्रसिद्ध विचारवंत, समाजशास्त्राचे प्राध्यापक, कथाकार, नाटककार विद्याधर पुंडलिक यांना गाठले. त्यांची-आमची चांगलीच जुंपली !

'हिंदु परंपरेचा गौरव करणारे हे शाहिरी कथन तुम्हाला रास्त वाटते का ?' आमचा प्रश्न.

'संतांनी आणि शिवाजीने महाराष्ट्राला अस्तित्व आणि अर्थ दिला. इ. स. १००० पासून चालू असलेल्या हिंदूंच्या अवनत—decadent—काळातील सर्वार्थांनी वेगळ्या असलेल्या या महापुरुषाने महाराष्ट्राला त्याचे मराठीपण बहाल केले—राष्ट्रवाद हे एक प्रभावी मूल्य आहे. ओघानेच परंपरेचा गौरवही आलाच. अशा किमान गौरवावाचून राष्ट्रवादाची कल्पना करणेही अशक्य आहे. शिवाजी हा एका अखिल भारतीय राष्ट्रवादी परंपरेचे एक प्रतीक स्थान आहे—'

'आजचे खरे प्रश्न काय आहेत ? तिकडे डोळेझाक करून शिवशाहिरांनी चालवलेले हे स्वप्नरंजन आक्षेपार्ह नाही वाटत ?'

'पुरंदरे हे ध्येयवादी मिशनरी वाटतात. या गृहस्थाने आपली एक धमनी इतिहासातील वातावरणाशी आणि चैतन्याशी जुळवली

आहे. कुणी असे करील का? इतिहासात एखाद्याने रमावे तरी किती? हे ज्याचे त्याचे खाजगी प्रश्न आहेत. आता कोणत्याही मिशनऱ्याची काही फॅड्स् असतात. पुरंदऱ्यांची ती ही आहेत; पण एका ध्यासातून अशी फॅडस् बाळगणारी माणसे महाराष्ट्रात निर्माण झाली याचा आपण एरवी गौरव करीत नाही काय? विनोबा भाव्यांसारखा सर्वोदयी यात्रिक, झाडू घेणारे सेनापती बापट, मोटारीचे टायर्स विलायती म्हणून सुंभाचे दोर चाकाला बांधणारे सेवकसेवानंद बाळूकाका कानिटकर, अशी एक ना दोन माणसे- पुरंदरे त्याच परंपरेतले. त्यांचा मुजरा, त्यांचा वेष, त्यांची दरबारी आदब, त्यांच्या गडावरील चकरा, हे सगळे एका इतिहासाच्या वेडापायी चाललेले आहे. अशी एखाद्या वेडापायी धुंदफुंद होणारी माणसे कमी होत आहेत हे तर आपले दुःख आहे!'

'शिवाजीमहाराजांचा अप्रतिहत जयजयकार काही राजकीय पक्षांना फायद्याचा तर काहींना तोटयाचा ठरतो त्याचे काय?'

'महाराष्ट्रात प्रत्येक राजकीय पक्षाने शिवाजीला अनिवार्यपणे राबविले आहे. यापुढेही तो राबविला जाईल; पण केवळ शिवाजीचे नाव घेतले म्हणून कोणत्याही पक्षावर शिवप्रभू प्रसन्न होणार नाहीत- आजवर तरी ते झालेले नाहीत!'

'पण या गौरवापायी आपला आर्थिक आणि वैज्ञानिक विकास दृष्टिआड होत नाही का?'

'परंपरा, आधुनिकता आणि विज्ञाननिष्ठा या गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत हे म्हणणे खोटे आहे, हे मला मान्य नाही. आपल्या समाजात आधुनिकतेचे प्रवाह क्षीण आहेत ही गोष्ट खरी; पण त्याची मुळे आपल्या नियोजनशून्य शिक्षणव्यवस्थेत आहेत... शिवाजीच्या विभूतीत व पूजनात नाहीत.'

आमचे बोलणे रस्त्यात चालू होते. शेवटी आम्ही प्रा. पुंडलिकांचा नाद सोडला. त्यांच्या विद्वत्तेविषयी आम्हाला शंका येऊ लागली. त्यांना आमचे काहीच मान्य नाही, हा आमच्या विद्वत्तेचा रस्तोरस्ती पा अपमान आम्हाला सहन होईना. आम्ही त्यांना निरोप दिल्यावर आमची चर्चा ऐकणारे एक गृहस्थ पुढे येऊन दरडावून म्हणाले-

'आत्ता गेले ते कोण हो?'

'पुंडलिक...'

तो माणूस मिशांवरून हात फिरवीत रागावून म्हणाला-

'त्यांना सांगा महाराजांचा ते एकेरी उल्लेख करीत होते. बाबासाहेबांच्या हे कानावर गेले तर ते संतापतील!'..

आम्ही मनात म्हटले की, आम्ही हे बाबासाहेबांच्या कानावर नक्कीच घालू. आमचा फार अपमान केलाय त्यांनी... बाबासाहेब फाडकन् ठेवून देतील!

पु. लं. सारख्यांनी म्हणावे-

'आज होणारा राज्यारोहणाचा सोहळा पाहण्यास महाराष्ट्राबाहेरचे लोक आले असतील तर त्यांना हेवा वाटावा असे हे दृश्य आहे. पुन्हा जन्म यायचा असेल तर शिवशाहीर पुरंदरे यांच्या शिवगंगेत स्नान करायला मिळावे म्हणून जन्माला यावे असे वाटणारा मी आहे-'

आणि प्रा. पुंडलिकासारख्या समाजशास्त्रीय विचारवंतांनी या धुंदफुंद वेडाचे कौतुक करावे! ही सर्व लक्षणे आम्हाला तरी ठीक दिसत नाहीत.

हिंदु संघटनेला पोषक ठरणारे चरित्र शाहिरांनी गावे यात आम्हाला निधर्मी राज्याला असणारा धोका, आम्ही विद्वान नसून स्पष्ट दिसतो आहे.

निधर्मी राज्याच्या उलट दिशेने आपला हा प्रवास सुरू आहे, असे सांगणारे विद्वान लवकर उपलब्ध होवोत अशी प्रार्थना करण्यापलीकडे आपल्या हातात दुसरे काय बरे आहे?

—विनय सहस्रबुद्धे

---

परराष्ट्रीय घडामोडी

# ब्रिटन : वाइटाकडून वाइटाकडे

ब्रिटनच्या निवडणुका पार पडल्या. मार्गारेट थॅचरच्या नेतृत्वाच्या कॉन्झर्वेटिव पक्षाला निर्विवाद बहुमत तर मिळालेच; पण वाटले होते त्याहूनही जास्त जागा मिळाल्या. अर्थात् त्यामुळे ब्रिटनपुढचे प्रश्न सहज सुटतील असे नव्हे. किंबहुना ते अधिकच गुंतागुंतीचे होण्याची शक्यता आहे. सध्याचे जेम्स कॅलॅघनचे लेबर सरकार गेले एक वर्ष अतिशयच अस्थिर होते. स्वतःच्या ताकदीवर ते उभे रहाण्याची शक्यता एकदा मावळल्यावर लिबरल पक्षाच्या १३ जागांच्या कुबडीवर जेमतेम तगून राहिलेले हे सरकार केव्हा कोसळेल त्याचा नेम नव्हताच. तसे ते कोसळले आणि पाच मेला निवडणुका झाल्या.

### ब्रिटनपुढचे प्रश्न

थॅचरबाईंना विजयानंतर पहिल्या कोणत्या प्रश्नाला सामोरं जावं लागणार असेल तर तो ट्रेड युनियन्सचा प्रश्न. विशेषत: गेल्या चार-पाच महिन्यांत ब्रिटनला संपाने इतके तडाखे दिले आहेत की, सध्या संपूर्ण युरोपात औद्योगिक वाढ ब्रिटनची कमी आहे. अर्थव्यवस्था संपूर्णत: कोलमडलेली, संपाने परत एकदा ट्रेडयुनियन्सची ताकद भीषण स्वरूपात लोकांपुढे आलेली आणि त्यांना आवर घालायला सरकार असमर्थ असा खेळ चार-पाच महिने चालला. संपाने कोणतेच राष्ट्रीय महत्त्वाचे क्षेत्र वर्ज्य केले नाही. रेल्वेपासून अत्यावश्यक वैद्यकीय सेवेपर्यंत, शिक्षणसंस्थांपासून नगरपालिकेच्या पाणीपुरवठाकर्मचाऱ्यांपर्यंत सर्वस्पर्शी असे संप चालू होते. त्यामुळे लिबरल-लेबर ('लिब-लॅब पॅक्ट' या नावाने हे प्रेम ओळखले जाई.) युती दिवसेंदिवस ताणली जात होती.

सगळ्या किडलेल्या राज्यव्यवस्थेचे दोष मुळापर्यंत गेलेले आहेत. शासनसंस्थेला कोणीच जाब विचारू शकत नाही इतकी ती नोकरशाहीच्या विळख्यात दडपली गेलेली आहे. तो दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

बाकी करव्यवस्था, पगारवाढी वगैरे प्रश्न आहेतच. शिवाय आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे म्हणजे European Economic Community व ब्रिटनने रहायचे किंवा नाही, North Atlantic Treaty Organization मध्ये किती प्रमाणात सहभाग घ्यायचा हे होत.

## कॉन्झर्वेटिव पक्षाची भावी धोरणे

कॉन्झर्वेटिव पक्ष सत्तेवर आल्याने व आश्वासने पाळील अशी अपेक्षा असल्याने त्यांचा अभ्यास करणे उचित ठरेल. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे ती म्हणजे जरी लेबर आणि टोरी (कॉन्झर्वेटिवज् या नावानेच जास्त ओळखले जातात) हे परस्पर विरोधी पक्ष असले, तरी दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांच्या धोरणात लक्षणीय फरक पडलेला नाही. लेबर जरा डावीकडे झुकतात तर टोरी मध्यम मार्ग स्वीकारतात; परंतु या निवडणुकीत गदारोळ माजला तो मिसेस थॅचरच्या स्पष्टवक्तेपणाने. मते घालवायची नाहीत म्हणून सामान्यत: 'नरो वा कुंजरो वा' असा टोरीचा मॅनिफेस्टो असतो. या वेळी मात्र प्रमुख काही गोष्टी स्पष्ट करण्यात आल्या– पहिलं म्हणजे चलनफुगवटयावर नियंत्रण ठेवणे. पौंडाचा भाव जरा वधारल्यामुळे काही प्रमाणात हे शक्य होईल. पार्लमेंटचा वचक परत बसवणे आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे हे दुसरे आश्वासन. 'पार्लमेंटचा वचक' हा शब्दप्रयोग खास कामगारसंघटनांना उद्देशून आहे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात येईल हेही रोखठोक शब्दात सांगितले आहे. हे नियंत्रण ठेवण्यासाठी खालील प्रमुख उपाय योजण्यात येतील :

१) सेकंडरी पिकेटिंग बंद करण्यात येईल. सेकंडरी पिकेटिंग हा प्रकार मध्यंतरी ब्रिटनमध्ये वोकाळला होता. प्रायमरी पिकेटिंग म्हणजे निदर्शने वगैरे नेहमीचे पिकेटिंग. सेकंडरी पिकेटिंग म्हणजे प्रत्यक्षात या ना त्या प्रकाराने (प्रसंगी मारहाण करून) कामावर जाणाऱ्या कामगाराला युनियनने दहशतीने परावृत्त करणे. लेबर पक्षाची बहुतेक मते (व पैसा) यांच्यावरच अवलंबून असल्याने ते आपले हताशपणे हे पहात होते.

२) युनियनमधून काढून टाकल्यास कोर्टात दावा करण्याचा अधिकार कामगारांना देणे. यामुळे संघटनांची मनमानी कमी होईल हा हेतू.

३) नोकरी सोडावी लागणाऱ्यांना अधिक व भरपूर नुकसानभरपाई.

४) गुप्त मतदानपद्धतीने जर 'प्रचंड बहुमताने' कामगारांनी ठरवले, तरच टाळेबंदी आणि टाळेबंदीला 'औद्योगिक' नसणाऱ्या शहरात संपूर्ण मनाई.

५) संपावर जाणाऱ्यांच्या मदतीसाठी युनियन्सनी स्वत: पैसा खर्च करावा अशी कायदेशीर तरतूद.

यातील प्रत्येक कलम मिसेस थॅचरना त्रासदायक ठरण्याचा संभव आहे. टोरीज्चा बहुतेक भर निवडणुकी दरम्यान याच मुद्द्यांवर होता आणि मतदारांनी व्यवस्थित वाजूने कौल दिल्याने या थोड्याफार फेरफारांनी अमलात आणणे अशक्य नाही.

विशेषत: लेबर्सचा लेबर रिलेशन ॲक्ट एम्प्लॉयमेंट प्रोटेक्शन ॲक्ट यावर थॅचर तुटून पडल्याने त्यांचेही भवितव्य संदिग्ध आहे.

परंतु कामगार संघटनांबद्दल बोलताना कोणतेही आततायी पाऊल उचलणे त्रासाचे ठरेल. आधीच्या टोरी पंतप्रधान हिथपासून म्हणजे सत्तर सालापासूनच हा त्रास सुरू झालेला आहे आणि गळयात गळे घालण्यापासून ते एकमेकांचे गळे आवळण्यापर्यंतचे सगळे उपाय दोन्ही पक्षांच्या सरकारांनी कामगार संघटनांबाबत योजून पाहिले आहेत आणि अजून जडीबुट्टी सापडलेली नाही, ती मिसेस थॅचरच्या अदूरदृष्टी असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाकडून सापडेल अशी आशा करायलाही जागा नाही. त्यातल्या त्यात कमी जहाल असणाऱ्या टोरीजनी कामगार-संघटनांचे विकेन्द्रीकरण करण्याचे धोरण अवलंबण्याचे ठरवले आहे ते वस्तुस्थितीत उतरू शकेल; पण तेसुद्धा फार सावकाश अंमलात आणावे लागेल.

थॅचर-सरकारने आणखी एक कडक धोरण अवलंबणार अशी घोषणा केली आहे. ती म्हणजे संरक्षणखर्चात वाढ. सब् मरीन मिसाइल्स, क्रुझ मिसाइल्स आणि अणुशक्तीत वाढ हे प्रमुख तीन घटक या धोरणात असतील.

करांमध्ये कपात करण्यात येईल. इन्कमटॅक्स सगळयात जास्त ८३ टक्के आहे तो ६० टक्क्यांवर आणि त्या प्रमाणात खालपर्यंत घट करून तळाच्या लोकांना करमाफी होईल.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पब्लिक सेक्टरवर गदा. समाजवादाकडची वाटचाल एकदाची बंद करून टाकणार असे थॅचरने ठामपणे सांगितले होते. एरोस्पेस, जहाजबांधणी आणि नॅशनल प्लेट कॉर्पोरेशन या राष्ट्रीयीकृत संस्थांची विक्री करून त्या प्रायव्हेट क्षेत्रात आणण्यापर्यंत घडयाळाचे काटे उलटे फिरवण्यात येतील. संरक्षण आणि आरोग्य सोडता सर्व सरकारी खात्यांच्या खर्चात मोठया प्रमाणावर कपात होईल.

आरोग्यखात्यातल्या कर्मचाऱ्यांच्या संपाला लेबर सरकारला नीट तोंड देता आले नाही म्हणून कडाडून हल्ला प्रचारात थॅचरतर्फे चढवण्यात आला होता. आता बहुधा त्यासारख्या अत्यावश्यक सेवांमधील कर्मचाऱ्यांना संपावर जाण्याचा अधिकार नाकारण्यात येईल.

लेबर आणि कॅलॅघन : मजेची गोष्ट म्हणजे जेम्स कॅलॅघन हा डाव्यांच्यातला उजवा समजला जातो. 'लेबरचा कॉन्झर्वेटिव्ह पंतप्रधान' असा त्याचा लौकिक होता. त्यातल्या त्यात जेवढे शक्य होते, तेवढे त्याने केले; पण शेवटी कामगार संघटनांनी विस्कळित झालेल्या आणि दिवाबत्तीखेरीज रहाण्याची वेळ आलेल्या ब्रिटिशांनी त्याला जबर तडाखा देऊन आपला निषेध नोंदवला. 'बेकारी' हा लेबरपार्टीचा परवलीचा शब्द होता. थॅचरच्या समाजवादाला रामराम ठोकण्याच्या घोषणेचा अर्थ बेकारीत भर एवढाच आहे असे त्यांनी मतदारांना ओरडून सांगितले; पण गेल्या पन्नास वर्षांत प्रथमच सत्तारूढ पक्षाला गैरसोयीच्या वेळी निवडणुका घ्याव्या लागल्या आणि लेबर सत्ताभ्रष्ट झाले.

परत विरोधी नेता म्हणून सदसष्ट वर्षांच्या कॅलॅघनचीच नेमणूक झालेली आहे; पण तो दोन-तीन वर्षांत निवृत्त होण्याची शक्यता आहे त्याच्यानंतर लेबरमधले अंतर्गत मतभेद तीव्र होतील. विरोधी पक्ष म्हणून फारशी जबाबदारी नाही आणि जहाल डाव्यांच्या पक्षाला अधिक डावीकडे ओढण्याचा प्रयत्न, कामगार संघटनांशी दुरावलेले संबंध या सगळया जंजाळात लेबर एकत्र टिकून तरी रहात आहेत की नाहीत अशी शंका यावी.

लेबरचा दोस्त पक्ष लिबरलही निवडणुकीत मागे पडला. होमोसेक्शुअल, खुनाचा प्रयत्न करणारा म्हणून प्रसिद्धीला आलेला आणि चौकशी चालू असलेला जेरमी थॉर्प हा त्यांचा विवाद्य व्यक्तिमत्त्वाचा नेताही पराभूत झाला. बाकी डेव्हिड स्टील वगैरे मंडळी निवडून आली; पण आता या विरोधकांची सर्वांची मिळून ताकदही २९६ इतकीच आहे. (सत्तारूढ ३३०) त्यामुळे लेबरपार्टीला मदत करायच्या मोबदल्यात राष्ट्रीय धोरणात जसे त्यांचे मत विचारात घेतले जात होते, तसे आता होणार नाही.

ब्रिटनच्या नव्या परराष्ट्रीय धोरणाचा आढावा मागच्याच आठवडयात श्री. वा. दा. रानडे यांनी घेतला आहे म्हणून पुनरुक्ती करीत नाही. पहिली आंतरराष्ट्रीय महत्त्वाची बैठक २२ जूनला थॅचरना पंतप्रधान या नात्याने आहे; पण परराष्ट्रीय धोरणात NATO मध्ये अधिक जोरदार भाग घेणे, रशियाविरोधात जरा भर घालणे त्यायोगे SALT 2 ZI (स्ट्रॅटेजिक आर्म्स लिमिटेशन ट्रीटि)च्या मार्गात अडथळे आणणे हे प्रमुख मुद्दे असतील.

एकूण थॅचरबाई किती थंड डोक्याने वागतात आणि किती झटपट वागतात यावर देशाची अंतर्गत परिस्थिती अवलंबून आहे. ब्रिटनला गेलेली प्रतिष्ठा जगात परत मिळवून देणे ही एक प्रचारातली महत्त्वाची घोषणा होती. जग दूर राहू द्या, स्वत:च्या नागरिकांना धड सुखाने जगता येईल एवढी सोय पाहिली तरी पुष्कळच मिळवले असे सद्य:स्थितीत म्हणता येईल. □

# एकात्म भारतासाठी....

## विद्यार्थी परिषदेचा उपक्रम : 'मेरा घर भारत देश'

[ अ. भा. विद्यार्थी परिषदेच्या आंतरराज्य छात्र जीवनदर्शन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून अरुणाचल प्रदेशातील ३० विद्यार्थी सध्या महाराष्ट्रात आलेले आहेत. ( मुक्काम ९ मे ते २८ मे. ) हे विद्यार्थी मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर या महाराष्ट्रातील शहरांबरोबरच गोव्यालाही जाणार आहेत. या उपक्रमाची एकूण माहिती देणारा लेख... ]

भारताचा ईशान्येकडील रखवालदार म्हणजे अरुणाचल प्रदेश ! यांत्रिक जीवनापासून शेकडो योजने दूर आणि निसर्गाच्या सान्निध्यात रमणाऱ्या निसर्गवेड्या रसिकांचा देश म्हणजे अरुणाचल प्रदेश !

भारताच्या नकाशात प. बंगालनंतर चिंचोळ्या अरुंद भूभागाने सांधलेला साधारण त्रिकोणी असा जो भाग आहे त्यात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची संख्या इतकी अफाट आहे की, सहसा त्या सर्व प्रदेशांची माहिती, ( राजधान्या, भाषा, इ. इ. ) मिळवण्याचा खटाटोप कोणी करीत नाही; पण तेजू, अलाँग, झिरो आणि बोमडिब या मोजक्या जिल्ह्यांचा आणि ८३,५७८ कि. मी. विस्ताराचा हा प्रदेश–अरुणाचल–मुद्दाम माहिती करून घ्यावी असा वैशिष्ट्यपूर्ण आहे.

अरुणाचल प्रदेशाची लोकसंख्या असेल जवळपास पाच–साडेपाच लाख. साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी. आकड्यात सांगायचे तर फक्त ११·३% ! राज्यात इंग्लिश भाषेचे प्रस्थ आहे; पण इंग्लिशच्या जोडीने अन्य जमातींच्या भाषांचाही हळूहळू विकास होत आहे. राज्यात अवघी ४ मोठी शहरे आहेत आणि इटानगर हे शहर राजधानीचे ठिकाण आहे.

१९६२ पर्यंत हा भाग 'नेफा' म्हणून ओळखला जात होता आणि ६२ च्या चिनी आक्रमणात हे नाव विशेष गाजले. तत्पूर्वी ब्रिटिशांच्या अमदानीत बरीच वर्षे हा सीमावर्ती 'नाजुक' भाग परराष्ट्रव्यवहारखात्याच्या अखत्यारीत होता. त्यामुळे सैनिक हेच जणू इथले राज्यकर्ते होते. नंतर मात्र गृहखात्याकडे या प्रदेशाची जबाबदारी आली. काही वर्षांपूर्वीच 'नेफा'चे अरुणाचल प्रदेश असे नामकरण झाले आणि या केंद्रशासित प्रदेशात खऱ्या अर्थाने लोकशाही आली.

अरुणाचलप्रदेश हा तीन टेकड्यांनी मिळून बनलेला प्रदेश आहे. खासी, गारो आणि जयंतीया या तीन टेकड्यांच्या प्रदेशात त्या त्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमाती राहतात. या प्रत्येक जमातीची भाषा वेगवेगळी आहे. फार काय संस्कृतीतही जाणवेल अशी भिन्नता आहे.

हा सर्वच भाग भारताच्या मूळ राष्ट्रीय प्रवाहापासून खूप दूर, एकीकडे आणि बराचसा दुर्लक्षित असा राहिल्याने भारतीय जनतेपासून भौगोलिक आणि मानसिकदृष्ट्याही खूपच अलिप्त आहे. ब्रिटिशांच्या अमदानीत या भागात फक्त विदेशी मिशनऱ्यांनाच प्रवेश होता त्यामुळे ख्रिश्चनांचे प्रस्थ या भागात मोठे आहे. विशेषतः खासी जमातीत बहुसंख्य ख्रिश्चन धर्मीय आहेत व अन्य जमातींतही ख्रिस्ती धर्मांतरितांचे प्रमाण मोठे आहे.

शिक्षणाचा प्रसार राष्ट्रीय एकात्मतेला पोषक ठरतो; पण या भागात एका प्रदेशात अवघी एक किंवा दोन महाविद्यालये आहेत. त्यामुळे उर्वरित भारताशी भावनिक संबंध सांधणारा हा दुवाही खूपच कच्चा आहे.

उगवत्या सूर्याच्या उपासकांच्या या प्रदेशातील हे बोचरे वेगळेपण अन्य प्रदेशातून तिथे जाणाऱ्या कोणालाही जाणवेल असेच आहे. काही वर्षांपूर्वी श्री. पद्मनाथ आचार्य आणि श्री. दिलीप परांजपे यांनी या भागाचा प्रवास केल्यानंतर त्यांनाही या प्रदेशातील जनतेचे उर्वरित भारताशी 'नसलेले नाते' जाणवले आणि या जाणिवेतूनच विद्यार्थी परिषदेच्या 'आंतर राज्य छात्र जीवनदर्शन' या प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

ज्यांनी कधी मोठी शहरे पाहिली नाहीत, रेल्वेतून प्रवास केला नाही, फार काय, पण जिथे वाहतुकीच्या सुविधेच्या अभावी चारचार दिवस चालल्यानंतर एका गावाहून दुसरीकडे पोहोचता येते अशा या प्रदेशातील युवक-विद्यार्थ्यांनी काही दिवस देशाच्या अन्य भागात रहावे, त्यांची संस्कृती जाणून घ्यावी, या व अशा उद्देशातून या प्रकल्पाचा जन्म झाला. गेल्या पाच-दहा वर्षांत या प्रकल्पांतर्गत अरुणाचल, नागभूमी या भागातले विद्यार्थी मुंबई, अहमदाबाद, बनारस, मद्रास इ. भागात जाऊन राहून आले. तसेच महाराष्ट्र, गुजरात या भागातूनही विद्यार्थी अरुणाचल प्रदेशात जाऊन आले. मध्यंतरी डिसेंबर १९७७ मध्ये गोहाटी येथे विद्यार्थी परिषदेतर्फे राष्ट्रीय एकात्मता परिषद भरविण्यात आली होती. ती परिषद म्हणजे या प्रकल्पाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा होता.

'आंतरराज्य छात्र जीवनदर्शन' या या प्रकल्पाचा व्याप तसा मर्यादित होता, हे खरेच; पण तरीही ह्या प्रकल्पांतर्गत होणारे प्रवास हे पर्यटनाच्या भूमिकेतून होत नव्हते, तर परस्परांच्या जीवनाची नीट ओळख व्हावी व दोन टोकांवरील दोन प्रदेशांतील या उगवत्या पिढीत आपण सारे एकच–भारतीय–आहोत, ही भावना रुजावी या उद्देशानेच होत होते. परिणामतः अरुणाचलचा कोणी, ताशी लामा किंवा नागभूमीतला तान्या लिंगडो भारतमातेचा जयजयकार न कचरता धीटपणे करू लागले. आपण एकटे नाही आपल्याबरोबर साठ कोटी भारतीय जनता आहे हेही त्यांना उमजले.

आंतर राज्य छात्र जीवनदर्शनाचेच अधिक चिरस्थायी, अधिक शाश्वत स्वरूप म्हणजे 'मेरा घर भारत देश' हा प्रकल्प. या प्रकल्पांतर्गत अरुणाचल प्रदेशातील १०–१५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, रहाण्याची सर्व जबाबदारी विद्यार्थी परिषदेने स्वीकारली. अर्थात मुंबईतील अनेक परिवारांनी सहाय्य केले नसते तर हा प्रकल्प उभा राहूच शकला नसता. प्रसिद्ध गायक सुधीर फडके, परिषद

कार्यकर्ते दिलीप परांजपे, श्री. व सौ. बक्षी, माटुंग्याचे सावरकर कुटुंबीय प्रभृतींनी एकेका विद्यार्थ्याची जबाबदारी आनंदाने उचलली आणि वेश, भाषा, आचार-विचार इ. सर्वच बाबतीत भिन्न असलेली ही मुले आपल्या नव्या घरात नव्या पालकांसह गुण्यागोविंदाने नांदू लागली. साहजिकच इटानगरचा कोणी लेंगचो मुंबईच्या प्रदीप किंवा सुनीलचा जिवाभावाचा मित्र बनला. मुंबईतल्या या कुटुंबांनी ही जबाबदारी स्वीकारली तीही थोडाथोडका काळ नव्हे, तर चांगली आठ-दहा वर्षे.

आज दहा वर्षांपूर्वी रहायला आलेली ही मुले पदवीधर झाली आहेत. ज्ञानाचे कण वेचून पुन्हा आपल्या मायभूमीत परतली आहेत. तासी लाम राज्यशास्त्रात एम. ए. ची पदवी घेऊन आपल्या गावी शाळेतला शिक्षक बनला आहे. तालुक मिजे शालेय शिक्षण संपवून पासी घाटला पुढच्या शिक्षणासाठी गेला आहे. तान्या बसार, नीदो तामा हेही असेच यशस्वी शिक्षणानंतर पुन्हा आपल्या खेड्यात परतण्याच्या मार्गावर आहेत.


शिक्षण घेऊन खेड्यात परतणे हा या प्रकल्पाचा गाभा आहे. मुंबईच्या रंगीबेरंगी वातावरणाचा, कंपनीतील छान छान नोकरीचा मोह सोडून खेड्यात गाडून घेणे ही सोपी गोष्ट नाही. विद्यार्थी-परिषदेच्या या प्रकल्पाने हे साधले याचे कारण या प्रकल्पातून घडविलेले संस्कार !

'मेरा घर भारत देश' हा प्रकल्प केवळ जसा मुंबईपुरता मर्यादित नाही तसाच तो केवळ ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांपुरताही मर्यादित नाही. याचे कारण ईशान्य भारतातील विकासाच्या, एकात्मतेच्या समस्या जशा गंभीर आहेत तशाच त्या धुळे, नाशिक, ठाणे, चंद्रपूर या भागांतील आदिवासींच्या बाबतीतही आहेत. या समाजाची उपेक्षा थांबावी, त्यांनाही सर्व संधींचा लाभ घेता यावा, विकासाची दारे त्यांच्यासाठीही खुली व्हावीत या उद्देशाने निवडक आदिवासी विद्यार्थ्यांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला. पुणे, सोलापूर इ. शहरांत या दृष्टीने यशस्वी प्रयत्न झाले आणि लातूरच्या विवेकानंद संस्कार केंद्राने या प्रकल्पाला चिरस्थायी स्वरूप दिले.

लातूरच्या या संस्कार केंद्रात आदिवासी विद्यार्थ्यांची शिक्षणाची, रहाण्याची सर्व सोय तर आहेच; पण मुख्य म्हणजे अनेक वर्षे अंधारात राहिलेल्या ह्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल याकडे इथे बारकाईने लक्ष दिले जाते. आज ह्या संस्कारकेंद्रातून बाहेर पडलेला मौजीमन वळवी फार्मसीचे शिक्षण घेत आहे तर किशोर खेडकर पॉलिटेक्निकच्या तिसऱ्या वर्षात आहे. तळोद्याच्या केशवराव पवारगुरुजींसारखे अनेक आदिवासी कार्यकर्तेही या प्रकल्पाला हातभार लावीत आहेत.

अर्थातच हा आभाळाएवढा प्रकल्प एकाएकी उभा राहिलेला नाही. प्रा. यशवंतराव केळकर, श्री. पद्मनाभ आचार्य, श्री. सतीश मराठे, अरुणाचलात शिक्षक म्हणून गेलेला शंतनू शेंडे आणि अशोक करंदीकर, लातूरच्या संस्कार केंद्राचे श्री. प्रकाश पाठक या आणि अशा अनेक कार्यकर्त्यांचे परिश्रम या प्रकल्पामागे आहेत.

वारंवार होणाऱ्या दंगली, भाषा आणि धर्मभेदांवरून उसळणारे प्रक्षोभ आणि अशी सगळी स्थिती असतानाही राजकारणात मश्गुल झालेल्यांकडून राष्ट्रीय एकात्मतेकडे होणारे दुर्लक्ष या पार्श्वभूमीवर विद्यार्थी-परिषदेचे हे कार्य आशेचा किरण वाटावे असेच आहे. ☐

हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.
( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

–डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## ☐ पैसा बोलतो आहे

कार्यक्रमाचं आमंत्रण मिळालं म्हणून कित्येक लोक जसे जाऊन बसले तशीच मीही जाऊन बसले. कार्यक्रम होता एका पुस्तकाच्या प्रकाशनाचा. जयशंकर प्रसाद नावाचे हिंदी कवी ( आज हयात नाहीत ), त्यांची एक जुनी प्रदीर्घ कविता 'आंसू'. ह्या कवितेचं उत्स्फूर्तपणे इंग्रजीत भाषांतर केलंय जयचंद सदानी नावाच्या गृहस्थांनी. त्यांच्या जमेला साहित्यनिर्मिती यथातथाच. यापूर्वी इंग्रजी अनुवादाचा कसलाही प्रयास केलेला नाही; पण हा एक उपक्रम स्तुत्य व्हावा ( किंवा करून घ्यावा ) ह्या इराद्यानेच केवळ समारंभ घडवून आणलेला. पुस्तकाचं भव्य प्रकाशन साहित्य संस्कृति संसद नावाच्या पंचवीस वर्षे वयाच्या ( असं म्हणतात ) संस्थेनं केलं. खूप लोक बोलावले. प्रकाशन-समारंभ एका थोर व नामवंत बंगाली कवीच्या हस्ते करून आणखी चार जणांना पुस्तक-भाषांतराप्रीत्यर्थ वक्तव्य करण्यासाठी व्यासपीठावर बसवलं. कार्यक्रमाचा एकूण 'शो' चांगला झाला; पण एकदा एका प्रोफेसरांनी काढलेल्या उद्गारांची उगाचच आठवण झाली. ते म्हणाले होते– विद्यार्थी जर डेकोरेटिव्ह भाषा लिहू लागले, लांबलचक उत्तर देऊ लागले व कोरीव अक्षर काढू लागले की समजावं– 'भीतरे माल किच्छु नाई' ( आत मुद्देमाल काहीच नाही ). तशातलाच हा काही प्रकार असेल की काय याची शंका आली म्हणून मी एका ओळखीच्या प्रतिष्ठित गृहस्थांना ( त्या संस्थेशी संबंध नसलेल्या ) सहज विचारलं, 'हा सदानी फार मोठा कवी आहे की काय ? त्याने इंग्रजीतून भरपूर काव्यरचना केली असेल ?'

ते गृहस्थ म्हणाले, 'छे ! तो एक चांगल्यापैकी व्यापारी आहे !'

मला नवल वाटलं. मी म्हटलं, 'मग एवढं प्रसिद्धीचं अवडंबर... भाषांतरकाराची अफाट स्तुती... इ. इ. कसं काय ? आणि पुस्तकं नंतर विकायला ठेवलेलीही दिसली का नाहीत ?'

ते गृहस्थ म्हणाले– 'गरज काय विकण्याची ? स्वतःचे पैसे खर्च करूनच पुस्तक छापून घेतलं आहे. आता स्वतःच्याच खर्चाने हा समारंभ घडवून आणला आहे आणि पुस्तकांच्या प्रती भेटीदाखल पाचपंचवीस लोकांना वाटून दिल्या की झालं. ह्या सगळ्या खटाटोपातून त्याला पैशाची अपेक्षा नाही. कीर्तीच्या वर्षावाची जरूर आहे; पण तो इतरांनी आपणहून न केला म्हणजे असा स्वतःच करून घ्यावा लागतो. पैसा असला म्हणजे हे सगळं सहज शक्य होतं.'

मी समजले. ह्यामागे मारवाडी समाजाची मनोव्यथा दडलेली आहे. ती मूक शब्दात म्हणते–'आम्हाला कल्चर्ड म्हणा, आम्हाला साहित्यिक म्हणा !'

*

## ☐ यांचंही थोडं कौतुक करा

'विद्यामंदीर' रंगमंच. 'राणीचा बाग' हे मराठी नाटक. सादरकर्ते–महाराष्ट्र मंडळ, कलकत्ता. प्रेक्षकवर्गात मराठी-अमराठी यांची सरमिसळ. निमित्त एका नाट्यमहोत्सवाचे. त्यात एकूण सात नाटके–हिंदी, बंगाली, गुजराती व त्यासमवेत एक मराठी नाटकही. एक प्रकारे मानाचं पानच. मराठी रंगभूमीचे निष्ठावान कलोपासक श्री. व सौ. धुरंधर यांनी जबाबदारी स्वीकारणं हे कौतुकास्पद आणि ती उत्कृष्ट प्रकारे पार पाडण्याची त्या उभयतांची तळमळ, धडपड खरोखरच प्रशंसनीय. निरपेक्ष बुद्धीने अशा प्रकारचे परिश्रम घेणाऱ्या व्यक्ती फार थोड्या असतात. त्यासाठी माणूस हाडाचाच कलाकार असावा लागतो. धुरंधरांच्या रक्तातच नाटक खेळत असतं असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये. शिवाय 'राणीचा बाग' ह्या नाटकाच्या कथानकाची कल्पना देणारी पत्रकं वाटण्यात आली असली तरी कुरूप नवरा नि आंधळी बायको ही पात्रे रंगमंचावर जिवंत करून अमराठी प्रेक्षकाला बांधून ठेवणं हे काम सोपं नाही. म्हणूनच धुरंधर पतिपत्नी यांचा गौरव करणं उचित आहे.

ज्या नाट्यमहोत्सवात हे मराठी नाटक सादर करण्यात आलं त्या महोत्सवाचं आयोजन करणारा देखील एक नाटकवेडा फकीरच. एखाद्या पैसेवाल्या गबर संस्थेनं नाट्यमहोत्सव घडवून आणणं वेगळं नि एका सामान्य शौकीन माणसानं चार लोक हाताशी धरून हा उपक्रम करणं वेगळं. अशा ह्या गृहस्थाचं नाव आहे आत्मानंद. चार-दोन हिंदी भाषिक रसिक मंडळी एकत्र आणून आत्मानंदांनी 'अभिनय साहित्य पत्रिका' नावाचं एक द्वैमासिक अलीकडेच सुरू केलं आहे. स्वतःच्या परिश्रमांचं आणि पगारातून वाचवलेल्या पैशांचं खतपाणी घालून गेली तीन वर्षं ते ह्या पत्रिकेचं पालनपोषण करीत आले आहेत. शिवाय दरवर्षी एक आदानप्रदान स्वरूपाचा कार्यक्रम घडवून आणावा हे ध्येय उराशी बाळगून वाटचाल करीत आहेत. त्या दृष्टीनंच ह्या नाट्यमहोत्सवाचं विशेष महत्त्व ! एका भाषेतील रंगमंचाचा दुसऱ्या भाषेतील रंगमंचाशी परिचय व्हावा व अशा नाट्यसंस्थांमध्ये परस्पर जवळीक निर्माण व्हावी हा फार मोठा उद्देश साधण्याचा प्रयत्न घडवून आणण्याचं काम आत्मनंदांनी जातीनं शिरावर घेतलं. ह्या महोत्सवात पेश केलेल्या मराठी नाटकाचं दिग्दर्शन व उत्तम अभिनय वठविणारे श्री. व सौ. धुरंधर आणि हा महोत्सव घडवून आणण्याची धडपड करणारे श्री आत्मानंद यांचं मनःपूर्वक अभिनंदन !

माणूस २१ मार्च (७९) अंकात वर्धा भागात घडलेली शांता-सुनीताची 'पुनर्जन्म' कथा प्रसिद्ध झाल्यावर वाईचे डॉ. शरद अभ्यंकर यांनी पुढील दोन लेख तडकाफडकी 'माणूस'कडे पाठविले. सावरकरजयंतीनिमित्त (दि. २८ मे) ते येथे प्रसिद्ध केले आहेत. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेची स्मृती जागवणारे व त्या विचारसरणीला पोषक ठरतील असेच हे दोन्ही लेख आहेत.

# १ : ज्योतिष आणि त्याचे नवे भावंड 'पिरॅमिडॉलॉजी'

काही दिवसांपूर्वी १८६ शास्त्रज्ञांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. कॅनडाच्या राष्ट्रीय संशोधन मंडळाचे डॉ. जेरहार्ड हर्झबर्ग आणि अन्य १७ नोबेल पारितोषक विजेत्यांचा या शास्त्रज्ञात समावेश होता. या छोट्याशा निवेदनात त्यांनी ज्योतिष या प्रकारावर कडाडून हल्ला चढवला आहे. या पत्रकात म्हटले आहे–'ढोंगबाज ज्योतिषांच्या बनावट दाव्यांना सरळ सरळ आणि जोरदार आव्हान देण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.'

एकदम पटलं आपल्याला. कारण आतापर्यंत फारच थोड्या लोकांनी आणि प्रकाशनांनी ज्योतिषाचे खरे स्वरूप उघड करून त्याची संभावना केली आहे. ग्रहांच्यावरची श्रद्धा या देशात हायसिंथसारखी फोफावली आहे. नुकत्याच केल्या गेलेल्या एका गॅलप पाहणीत असे आढळून आले आहे की, अमेरिका आणि कॅनडामधील ५ कोटी लोक आकाशस्थ ग्रहांच्या हालचालींवर आपले भवितव्य अवलंबून असते यावर साक्षात विश्वास ठेवणारे आहेत. टोरोंटो शहराच्या चतुःसीमेत व्यवसाय करणारे १०० ज्योतिषी आहेत. त्यांपैकी २० जण टेलिफोन डिरेक्टरीच्या पिवळ्या पानात आपल्या मालाची जाहिरातही करतात. यातल्या बऱ्याच जणांनी एकत्र येऊन 'टोरोंटो ज्योतिषी मंडळ' अशी आपल्या व्यावसायिकांची संघटनाही उभारली आहे. या मंडळाचे उपाध्यक्ष रूथ फॉरेस्ट मला सांगत होत्या, 'आमची बहुतेक गिऱ्हाइके डॉक्टर, वकील, व्यापारी, शिक्षक यांपैकी असतात.' 'त्यांच्या आयुष्यात काही संकट उभे राहिले की, ते माझा सल्ला घेतात.'

श्रीमती फॉरेस्ट वैयक्तिक आणि व्यावसायिक पत्रिकांमध्ये तज्ज्ञ आहेत. इतर काही जण शेअरबाजार, घोड्यांच्या शर्यती, योग्य अत्तराची निवड, रोगनिदान, तुमच्या कुत्र्याच्या वा मांजराच्या पुढील चांगलें व वाईट दिवस, प्रेमाच्या वा विवाहाच्या बाबतीत सल्ला, नोकरांच्या नेमणुकीबाबत सल्ला या विषयात विशेष सल्ला देऊ शकतात.

ज्योतिष हा बनावट प्रकार कसा आहे हे तुम्हाला सांगण्यापूर्वी ज्योतिषाबद्दल थोडक्यात स्पष्टीकरण मला करू दे.

ज्योतिषाचा मूलभूत सिद्धांत असा की, पृथ्वीवरील प्रत्येक मानव, प्रत्येक व्यवसाय आणि प्रत्येक प्राणी यांच्या आरोग्यावर, व्यक्तिमत्त्वावर, सुस्थितीवर आणि भवितव्यावर अवकाशस्थ गोलांचा परिणाम होत असतो. हा परिणाम जन्माच्या क्षणापासून सुरू होतो, तो मरेपर्यंत चालू राहतो.

जन्माची नेमकी वेळ महत्त्वाची असते. कारण ख-गोलांचेपासून निघणारा 'वैश्विक स्रोत' एकसारखा बदलत असतो. थोडक्यात म्हणजे चंद्र, सूर्य आणि इतर काही ग्रह (उदा. बुध, शुक्र, मंगळ, शनी, नेपच्यून, युरेनस, प्लेटो) यांचा चुंबकीय प्रभाव आणि कंपने, अवकाशस्थ ग्रहांची स्थाने निश्चित करण्याचे गुंतागुंतीचे सूत्र ठरवण्यात आले आहे. या स्थानानुसार माणसाचा स्वभाव आणि भवितव्य बदलत असते.

आणखी एक गोष्ट : ज्या कोठल्या राशीतून सूर्य तुमच्या जन्माच्या क्षणी मार्गस्थ होत असेल, त्याचा फारच महत्त्वाचा परिणाम तुमच्या भविष्यावर होतो. या राशी बारा असून त्यांना मेष, वृषभ, सिंह, कन्या अशी नेहमीच्या माहितीतली नावे आहेत.

या सर्व माहितीच्या आधारे ज्योतिषीबुवा तुमची पत्रिका मांडतात. या तक्त्यानुसार बऱ्याचशा अगम्य शब्दांच्या आवरणात, तुमच्या नियोजित प्रवासाकरता, प्रेम जमवण्याकरता वा अन्य कुठल्याही कामगिरीकरता चांगला दिवस कुठला, वाईट कुठला इ. सांगू शकतात. माझा काही या भाकड कथांवर विश्वास नाही आणि ही त्याची सयुक्तिक कारणे–

१ : आपल्या सिद्धांतांची सत्यता पारखून घेण्याच्या भानगडीत ही ज्योतिषी मंडळी कधी पडत नाहीत. या उलट या विश्वाच्या अगदी प्राथमिक आणि अपूर्ण ज्ञानावर आधारित असणारा असयुक्तिक वेडगळपणा म्हणजे ज्योतिष होय याविषयी खात्रीलायक पुरावे आहेत. 'जणू काही' प्रा. ओवेन रॅंचक्लिफ म्हणतात, 'आजच्या आधुनिक मानवाने ३००० वर्षांपूर्वीच्या इजिप्शिअन वा चाल्डियन संस्कृतीमधले औषधोपचार, कायदे वा मालमत्ता यासंबंधीचे नियम पुन्हा मानण्याची तयारी दर्शवण्यासारखे हे आहे.' (प्रा. रॅंचक्लिफ हे न्यूयॉर्क विद्यापीठात गूढवाद आणि धर्म या विषयावर पाठ घेतात. 'फसवा गूढवाद' The Occult Cenceir.') हे त्यांचे गाजलेले पुस्तक होय.)

उदाहरणार्थ, अवकाशस्थ ग्रहांचा मानवी जीवनावर महत्त्वाचा परिणाम होतो, तर फक्त बारा राशी, आठ ग्रह आणि सूर्य व चंद्र एवढेच ज्योतिषी का मानतात? आपल्या आकाशगंगेतील कोट्यवधी इतर गोलकांना

दुर्लक्षून त्यांचे कसे चालते ? त्यांची कंपने, ताल आणि उत्सर्जने यांना काहीच महत्त्व नाही का ?

या प्रश्नांची रोखठोक उत्तरे दिली तर ज्योतिषांच्यात चुळबुळ सुरू होते. आजच्या ज्योतिषशास्त्राची सुरुवात झाली त्या काळात, म्हणजे सुमारे १८०० वर्षांपूर्वी, अंतरिक्षाचा अभ्यास एवढा सखोल झालेला नव्हता. थोडीफार ओबडधोबड उपकरणे वापरून मिळालेल्या मर्यादित आकाशीय ज्ञानावर आपले 'शास्त्र' बसवणे ज्योतिषाच्या संस्थापकांना भाग होते.

पृथ्वीवर आणि त्यावरील मानवांवर ग्रहांचे आणि त्याहीपेक्षा दूर असणाऱ्या ताऱ्यांचे होणारे गुरुत्वाकर्षणाचे आणि इतर परिणाम अतिशय सूक्ष्मातिसूक्ष्म असतात; कारण हे ग्रहगोल पृथ्वीपासून प्रचंड अंतरावर असतात. हे ग्रहगोलक खरोखर कोटचवधी मैल दूर असतात असे आपल्या पूर्वजांना ज्ञान असते तर त्यांनी आपली उपपत्ती निश्चित सुधारली असती.

आणखी एक मुद्दा आहे. ग्रहगोलकांचा मानवी जीवनावरील परिणाम ज्योतिषशास्त्रात इतका फुगवून सांगितला जातो याचे कारण हे 'शास्त्र' फोफावत असताना्च्या काळात प्रचलित असणाऱ्या विचित्र समजुती. आपल्या पूर्वजांची अशी ठाम समजूत होती की, अवकाशस्थ ग्रहगोल ही देवांची वसतिस्थाने आहेत आणि आपल्या दैनंदिन व्यवहारात देवमंडळींना जबरदस्त रस असतोच.

## परस्पर विरोध

२ : बऱ्याच वेळा ज्योतिषी त्यांच्या लिखाणात एकमेकांविरुद्ध विधाने करतात. ज्योतिषाला शास्त्रीय पाया नसल्याचे हे द्योतक आहे. हे केवळ मी सांगतो आहे म्हणून खरे मानू नका. ज्योतिषविषयक १०० लेख आणि पुस्तके गोळा करा आणि पहा, एकमेकांविरुद्ध हे शास्त्रज्ञ उभे ठाकलेले असतात!

एक ज्योतिषी मकरराशीच्या लोकांचे वर्णन सोशिक, व्यवहारवादी आणि महत्त्वाकांक्षी असे करतो. हे तीन विस्तृत गुणविशेष वृषभराशीलाही लावले जातात. आणखी एक ज्योतिषी मकररासवाल्यांचे वर्णन चंचल आणि कौशल्यवान असे करतो–हेच गुणविशेष कन्याराशीलाही लावतात. भलताच गोंधळ आहे की नाही ?

'गूढ ज्ञानकोष' (Encyclopedia of Occult Sciences) हा 'अधिकृत' मानला जाणारा ग्रंथ जर तुम्ही काळजीपूर्वक वाचलात तर राशीनुसार माणसाचे व्यक्तिमत्त्व आणि स्वभाव ठरवता येतो या सर्वमान्य समजुतीच्या तात्काळ चिरफळ्या होतील. तूळराशीचे लोक (जन्मकाळ–२४ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर) हे मोठे रसिक असतात. फुले, सुंदर सुंदर रत्ने, संगीत आणि चित्रविचित्र पोशाख यांची त्यांना आवड असते. उदाहरणार्थ–ऑस्कर वाइल्डची तूळरास होती. अगदी बरोबर; पण मग २ ऑक्टोबरला जन्मलेल्या संततुल्य महात्मा गांधींचे हो काय ?

आता याच कोषातले सिंहराशीचे वर्णन काढून पहा. (२४ जुलै ते २३ ऑगस्ट) इथे तुम्हाला स्पष्ट लिहिलेले आढळेल की, हे लोक महत्त्वाकांक्षी, स्वतःचे वर्चस्व गाजवणारे असतात आणि त्यांचे भवितव्य फार उच्च वा फार नीच असे झोके खाते. फारच छान! कारण सीझर, नेपोलिअन आणि मुसोलिनी हे सर्व सिंहराशीचे होते; पण मग सिनेतारका माय् वेस्ट हिचाही जन्म ऑगस्टमधलाच! आणि शिवाय हुकुमशहा हिटलर आणि स्वरसम्राज्ञी ज्युली अँड्रयूज यांची पत्रिका एकच कशी ?

ज्योतिषीमंडळींचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांचा गुळमुळीतपणा. कधी रेडिओ–टी. व्ही. वर भविष्य ऐकाल, (मासिकातील वा साप्ताहिकातील भविष्य वाचाल त्या वेळी नीट लक्ष द्या. ज्योतिषीमहाराज युक्तिबाज आणि सर्वार्थसमावेशक शब्दप्रयोग वापरतात. त्यांची विशेषणे द्व्यर्थी असतात आणि बहुतेक अस्पष्ट अशा सर्वसाधारण गोष्टी सांगितलेल्या असतात. जे काय सांगितले जाते त्याचा काय अर्थ घ्यायचा हे ऐकणाऱ्याच्या वा वाचणाऱ्याच्या वैयक्तिक कल्पनाशक्तीवर आणि अर्थ लावण्यावर अवलंबून असते.

## चुकांचे प्रमाण अधिक

३ : आतापर्यंतचा अनुभव पहाता, पुढे घडणाऱ्या गोष्टी आधीच कळण्याबाबत ही तमाम ज्योतिषीमंडळी तोंडघशी पडतात असे दिसून येते.

आजच्या काळात सर्वांत सुप्रसिद्ध असणारी ज्योतिषीण जीन डिक्सन हिचेच उदाहरण घ्या ना. ज्या दिवशी जॅक्वेलिन केनेडीचा पुनर्विवाह झाला, त्याच दिवशीच्या वृत्तपत्रात प्रसिद्धीसाठी दिलेल्या आपल्या भविष्यात डिक्सनबाईंनी त्यांच्या दशलक्षावधी वाचकांना असा खात्रीपूर्वक दिलासा दिला होता की, जॅकीचा सध्याच काय, पण पुढेसुद्धा केव्हाही नवीन नवरा करण्याचा विचार नाही.

अर्थात हा आपला पचका सावरण्याकरता डिक्सनबाईंनी स्पष्टीकरण दिलेच. 'माझे भविष्य हे विवाहविषयक नकारार्थी कंपनावर आधारित होते; पण दुर्दैवाने ही कंपने जॅक्वेलिनचा आणखी एक मागणी घालू पहाणारा ब्रिटनचा लॉर्ड शरलेक याच्याकडून येत होती.'

(आपल्याकडील उदाहरणच द्यायचे तर बंगलोर येथे इंग्लंडविरुद्ध भारताने जिंकलेला सामना. ग्रहमान-परिस्थिती पहाता भारत हरणार आहे असे भविष्य अजंता जैन यांनी आदल्याच दिवशीच पुण्याच्या 'तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध केले होते. आता माणसाबिणसाची पत्रिका आपण समजू शकतो. सामन्याची पत्रिका हा प्रकार पचनी पडायला जरा कठीणच आहे!)

एकंदरीत पहाता कंपनाचा चुकीचा अर्थ लावायचा ही डिक्सनबाईंना नित्याचीच गोष्ट दिसते. 'नॅशनल एन्क्वायरर' (१४ फेब्रुवारी १९७१) आणि 'द फॅमिली वीकली' (१८ जानेवारी, १९७३) यामधून त्यांनी वर्तवलेल्या एकूण १७ भाकितांची मी तपासणी केली. आता पुरेसा कालावधी लोटल्यामुळे मी स्पष्टपणे सांगू शकतो की, त्यातली एकूणएक चुकीची ठरली उदा., सेनेटर हेन्री (स्कूप) जॅक्सन हे जगन्मान्यता पावतील, अध्यक्ष निक्सन यांच्या खुनाचा प्रयत्न होईल, जेन फोंडा नटीला मोठ्या दुःखद प्रसंगाला तोंड द्यावे लागेल.

याच डिक्सनबाईंनी प्रेसिडेंट केनेडीच्या खुनाचे भविष्य बरोबर सांगितले हे मान्य; पण यावरून निष्कर्ष काढण्यापूर्वी, पूर्वी किती वेळा त्यांनी केनेडीच्या आणि अन्य मोठ्या व्यक्तींच्या खुनाचे भविष्य वर्तवले होते? चुकीची भविष्ये, मग ती कितीही असोत,

विसरली जातात, बरोबर आलेल्या एखाद्याला मात्र अमाप प्रसिद्धी मिळते, हे सैद्धान्तिक सत्य आहे.

डिक्सनबाईंची भविष्ये चुकीची ठरतात म्हणून त्यांनाच एकट्यांना मी वेगळे काढतो आहे अशी तुमची समजूत व्हायला नको, म्हणून आपण आता ज्योतिष-क्षेत्रातली आणखी एक बडी असामी कॅरॉल राइटर यांचेकडे आपला मोर्चा वळवू. 'नॅशनल एन्क्वायरर'च्या १७ जानेवारी १९७१ च्या अंकात त्यांनी वर्तवलेल्या १३ भाकितांपैकी ११ चुकीची ठरली. जी बरोबर ठरली ती दोनही काही फारशी नेत्रदीपक म्हणता येत नाहीत. फ्रॅंको यांची तब्येत पुढील वर्षभर सुस्थितीत राहील आणि रशियाबरोबरचे थंडे युद्ध आणखीनच थंडे होईल.

मोठमोठ्या व्यक्तींचे भविष्य वर्तवणे हे राइटर यांचे खास क्षेत्र आहे. या आपल्या गुणाची एक थक्क करून सोडणारी चमक त्यांनी ११ एप्रिल १९७१ रोजी दर्शविली. एफ्. बी. आय. चे संचालक जे. एड्गर हूव्हर यांची पत्रिका मांडून त्यांनी भाकीत केले– '१९७२ साल हे हूव्हर यांना सर्वच दृष्टीने आरोग्य, सुखसमाधान आणि यश– समाधान-कारक जाईल.' हूव्हर २ मे १९७१ रोजी मरण पावले!

## पिरॅमिडॉलॉजी

कशावर तरी श्रद्धा बाळगायची म्हणून शोधार्थ फिरणाऱ्या ज्या कोणाला ज्योतिष-शास्त्र हे अगदीच उथळ वाटत असेल त्यांना मी पिरॅमिडॉलॉजी सुचवू इच्छितो.

या पिरॅमिडॉलॉजीचे कॅनडातील मुख्य प्रवर्तक आणि प्रचारक आहेत ३४ वर्षे वयाचे आल्फ्रेड वॉर्ड. गोलसर देहयष्टीचा, मोहक व्यक्तिमत्त्वाचा आणि दिलखुलास स्वभावाचा हा गृहस्थ टोरोंटोच्या एका उपनगरात रहातो. वॉर्ड यांचा या बाबतीतला उत्साह समजण्या-सारखा आहे; कारण पिरॅमिडच्या आकाराचे लहानमोठे नमुने, बिल्ले आणि पदके हे तयार करून विकणाऱ्या 'पिरॅमिड प्रॉडक्टस्,' कॅनडा या उद्योगाचे ते मालक आहेत. नुकतीच त्यांच्याशी माझी मुलाखत झाली, त्यात त्यांनी मला पिरॅमिड पॉवरचा सिद्धान्त आणि फायदे यांची इत्थंभूत माहिती दिली.

इजिप्तमधील पिरॅमिडच्या प्रमाणात तयार केलेली कुठलीही वस्तू 'जीव वैश्विक शक्ती' प्रसारित करते. ( Biocesmik Energy ) कारण, पिरॅमिडचा विशिष्ट आकार एखाद्या बहिर्गोल भिंगाप्रमाणे कार्य करतो आणि त्यातून वाहणाऱ्या पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीचे अनेक पटींनी वर्धन घडवून आणतो. काय, आले का लक्षात? साहजिकच, कुठलीही गोष्ट, मग ती प्राणी असो, वनस्पती असो वा धातू असो, पिरॅमिडच्या आत, खाली वा वर ठेवली तर तिच्यावर या 'जीव वैश्विक शक्तीचा' सुपरिणाम जादूसारखा होतो. याच शक्तीला साध्या शब्दात 'पिरॅमिड पॉवर' म्हणतात.

रोज सकाळी वार्ड आणि त्याची पत्नी मोठ्या उल्हसित मनाने जागे होतात. कारण त्यांचे बिछान्यावर ॲल्युमिनियमच्या नळ्यांची पिरॅमिडच्या आकाराची डंबरी उभारलेली आहे. 'या डंबरीमुळे कामेच्छा उत्तेजित होते आणि रतिक्रीडेचा आनंद किती तरी वाढतो.' वॉर्डसाहेब सांगतात, 'मी तर म्हणेन की, या आमच्या यंत्रामुळे अनेक विवाह तरलेले आहेत. शिवाय वंध्यत्वावरही याचा उपयोग होतो.'

'आल्बर्टाचे एक मूलबाळ नसणारे व्यापारी माझा सल्ला घ्यायला आले होते. त्यांनी असाच पिरॅमिड त्यांच्या बिछान्यावर बसवून घेताच त्यांच्या पत्नीला दिवस गेले.'

या वॉर्डमहाशयांच्या उपनगरातील घरात तर पिरॅमिड्सचा सुळसुळाट झालेला आहे. एक छोटा पिरॅमिड त्यांच्या मांजराच्या बिछान्यावर लावलेला आहे. कारण 'पिरॅमिड पॉवरमुळे १० वर्षांचे मांजर एखाद्या पिल्ला-सारखे चपळ बनते.' स्वयंपाकघरात पाणी भरलेली भांडी मध्यम आकाराच्या पिरॅमिडचे आत ठेवलेली आहेत, कारण असा दावा केला जातो की, 'पिरॅमिड–संस्कारित पाणी चवीला जास्त चांगले लागते, मृदू असते आणि त्यात शिजवलेल्या भाज्यांचा स्वाद टिकून रहातो.' वॉर्ड सांगतात– 'पिरॅमिड पाण्याने केस धुऊन विंचरले तर जसेच्या तसे रहातात आणि तोंडावर हे पाणी शिपडले तर माणूस जास्त ताजातवाना आणि तरुण दिसतो!'

वॉर्ड यांच्या म्हणण्यानुसार पिरॅमिड-शक्तीचे आणखी काही सद्गुण : दाढीची पाती यामुळे धारदार बनतात, मांस आणि भाज्या दीर्घकाल ताज्या रहातात, झाडे जोमाने वाढतात आणि फळे वा मांस न कुजता नुसते सुकते.

या पिरॅमिड–पॉवरमुळे एक गोष्ट मात्र घडलेली मला मान्य केलीच पाहिजे. ती म्हणजे या शक्तीने श्री. आल्फी वॉर्ड यांचे-करता बरीच रोकड निर्माण केली आहे. त्यांच्या मालामध्ये सर्वोत्कृष्ट खप असणारी वस्तू आहे 'पिरॅमिड जनरेटर.' १५ एक इंची चमकदार पिरॅमिडचा पुंजका, लोहचुंबक बसवलेल्या एका फळीवर उभारलेला. 'यांचे आतापर्यंत उत्तर अमेरिकेत आम्ही जवळ-जवळ दहा लाख नमुने खपवले आहेत आणि फक्त ५–६ लोकांनीच त्यांचे पैसे परत मागितले आहेत.' वॉर्ड उत्साहाने सांगतात, 'पिरॅमिड पॉवर किती अद्भुत आहे याचाच हा पुरावा!'

कुठलीही गोष्ट विकत घेतील असे लक्षा-वधी भोळे लोक सर्वत्र असतात याचाही हा पुरावा. पिरॅमिड शक्तीबाबत सर्वसाधारण माणसाला माहिती असणे आवश्यक आहे अशी एकच गोष्ट आहे, ती म्हणजे : अशी कुठली शक्ती नसतेच!

पिरॅमिडमधे एक आठवडा ठेवून दाढीच्या बोथट पात्याला धार आणता येईल काय? टोरोंटो येथील, रायरसन पॉलिटेक्निकल इन्स्टिटयूटच्या धातुशास्त्र–प्रयोगशाळेतील डेल सीमन्स या अभियंत्याने एका सूक्ष्मदर्शक-युक्त छायाचित्रकाने तीन बोथट पात्यांच्या कडांची छायाचित्रे घेतली. यातले एक पाते मग बाजारात मिळणाऱ्या एका पिरॅमिडमधे ठेवले, एक त्याच मापाच्या घरी बनवलेल्या पिरॅमिडमधे ठेवले आणि एक नुसतेच बाहेर ठेवले. सात दिवसांनी या पात्यांच्या कडांची पुन्हा छायाचित्रे घेण्यात आली. निष्कर्ष : 'पात्यांच्या धारेवर पिरॅमिडचा काहीही परिणाम होत नाही!'

पिरॅमिडमध्ये ठेवलेली फळे आणि भाज्या न कुजता नुसत्याच शुष्क होतील काय?

टोरोंटोचे ॲलन आस्टर–हे शास्त्र आणि औषधी शास्त्रातील पदवीधर आहेत. यांनी निरनिराळ्या प्रकारचे मांस, बटाटे, सफर-चंद, घेवड्याच्या शेंगा इ. पदार्थ निर-निराळ्या आकाराच्या पण एकाच आकार-मानाच्या पात्रात ठेवले. काही पिरॅमिडच्या आकाराची, काही ठोकळ्याच्या, काही

आयताकृती, त्रिकोणी शंकूच्या तर काही लोलकाच्या आकाराची ही पात्रे होती. पदार्थांचे काही नमुने नुसतेच उघड्यावर ठेवण्यात आले होते.

दर दोन दिवसांनी अशी दोन आठवडे या पदार्थांची पहाणी केल्यावर आल्टर यांनी निष्कर्ष काढला– 'पेशीयुक्त पदार्थ टिकवण्याचे अथवा सुकवण्याचे बाबतीत, पिरॅमिडच्या आकाराची पात्रे इतर कुठल्याही आकाराच्या पात्रापेक्षा जास्त परिणामकारक नसतात. थोडक्यात आम्ही 'बरणीच्या तत्त्वाचा' पुन्हा शोध लावला. हे तत्त्व म्हणजे 'कोठल्याही बंद पात्रात पदार्थ ठेवून बाहेरच्या हवेशी येणारा त्याचा संपर्क टाळल्यास तो उघड्या हवेत ठवलेल्या पदार्थापेक्षा जास्त टिकतो.'

पिरॅमिड पॉवरमुळे झाडे रोगापासून बचावतात आणि जास्त जोमाने वाढतात काय?

विल्क विद्यापीठाच्या बगीचा विभागाचे प्रमुख डॉ. इब नोनेके यांनी तारेच्या पिरॅमिडखाली वाढवलेली सात प्रकारची झाडे, ही जवळच बिनपिरॅमिडमध्ये वाढवलेल्या त्याच प्रकारच्या सात झाडांशी ताडून पाहिली. यानंतर त्यांच्या एका सहकाऱ्याने हाच प्रयोग आणखी काही प्रकारच्या झाडांवर करून पाहिला. नोनेक यांचा निश्चित निष्कर्ष 'वनस्पतींचे बाबतीत विचार केला असता, पिरॅमिड पॉवर वगैरे अस्तित्वातच नाहीत. माझ्या मते हा सर्व निव्वळ बकवास आहे.'

पिरॅमिड पॉवर अस्तित्वात नसल्याचा हा सर्व शास्त्रीय पुरावा मी अल्फी वॉर्ड यांना सादर केला आणि 'The Power of Pyramid Energy' या त्यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात याचा अंतर्भाव त्यांनी का केला नाही, असे त्यांना विचारले. खांदे उडवून ते म्हणाले 'असल्या पुराव्यांनी, आकड्यांनी आणि कृत्रिम आधारांनी माझ्या पुस्तकाचा खप कमी करण्याची माझी इच्छा नव्हती!'

*

: २ :

# वैचित्र्यपूर्ण खोटी माहिती खऱ्या माहितीपेक्षा अधिक खपते

फलज्योतिष, कुंडली, हस्तसामुद्रिक, छायाशास्त्र, भृगुसंहिता असल्या दैववादी आणि अशास्त्रीय समजुतींचे प्राबल्य भारतीय मनावर फार मोठे आहे. शास्त्रीय ज्ञानामध्ये पुढारलेल्या, सुशिक्षित, प्रगत पाश्चात्य समाजात याचे अवडंबर फार नसेल अशी माझी कल्पना होती; पण नुकताच कॅनडातील 'क्वेस्ट' मासिकातील एक लेख वाचनात आला. त्यावरून ही आणि यासारखीच अन्य खुळे तिकडेही बरीच बोकाळली आहेत याची प्रचिती आली. मात्र तिथल्या अनेक जाणकार विचारवंत आणि शास्त्रज्ञ मंडळींनी या अशास्त्रीय समजुतीविरुद्ध आघाडी उघडली आहे. त्यापैकी हा एक लेख आहे. भारतीयांनाही यापासून बोध घेता येईल. (मूळ लेखक सिड्ने काट्स. 'सेक्युलरिस्ट'मधून सौजन्याने)

ज्योतिषशास्त्र, अतींद्रिय संवेदना, पिरॅमिडल पॉवर बर्म्युडा त्रिकोण, जीवीय ताल (BIORHYTHM) साक्षात्कार, पुनर्जन्म यावर तुमचा विश्वास असेल तर तुमच्याकरता एक वाईट बातमी आहे. ती म्हणजे, अगदी साध्या शब्दात, तुम्ही अक्कलशून्य आहात!

तुमच्याप्रमाणेच या असल्या गूढवादावर, ऊर्फ तथाकथित अतिनैसर्गिक अथवा अतींद्रिय सिद्धांतावर विश्वास ठेवणारे दशलक्षावधी लोक असले तरी त्याने काहीच फरक पडणार नाही. हा सर्व भंकसपणा आहे. सुप्रसिद्ध अशा शास्त्रीय संशोधकांनी हे सर्व नाशाबित केले आहे. यातला कसलाही शास्त्रीय न्यायापुढे टिकू शकेल असा काडीचाही पुरावा नाही. तरीही अन्यथा सुबुद्ध असणारे लोक या गोष्टीवर विश्वास ठेवतच रहातात. का?

गेली काही वर्षे राष्ट्रीय एकात्मता, बेकारी आणि चलनफुगवटा या प्रश्नात आम्ही इतके गुरफटून गेलो आहोत की या असल्या खुळांवरील विश्वास हा एक बुद्धिमान, निरोगी आणि लोकशाहीवादी समाज म्हणून अस्तित्व टिकून राहण्याला खरोखरीचा धोका आहे हे आपल्या लक्षातच आलेले नाही.

लक्षावधी अनुयायांच्या योगे 'नवा धर्म' होऊ पहाणाऱ्या मूर्खपणाची आणि तर्कदुष्ट समजुतींची ही पहा एक छोटीशी झलक. ज्योतिषशास्त्र, सायंटॉलॉजी, पिरॅमिडॉलॉजी, बर्म्युडा त्रिकोण, वनस्पती–संभाषण, जीवीय ताल, अॅस्ट्रल प्रोजेक्शन, ऑरा, उडत्या तबकड्या, एरिक फॉन डॅनिकेत आणि त्याचे प्राचीन अवकाशवीर, पुनर्जन्म; सायको कायनेसिस (मन:सामर्थ्याने वस्तू हलवणे आणि मन: सामर्थ्याने रोग बरे करणे.

या सर्वांना सुयोग्य असे नामाभिधान नसल्यामुळे मी या लेखात या सर्वांना अतिनैसर्गिकावरील (Para normal) श्रद्धा म्हणणार आहे.

नुकताच, असल्या गोष्टींवर विश्वास बाळगणाऱ्या माणसांना उद्देशून विश्वासवेडा' (credophile) हा एक चपखल नवीन शब्द बनवण्यात आला आहे. याची व्याख्या अशी–जो कोणी (१) जी गोष्ट सिद्ध झालेली नाही किंवा (२) जिच्या विरुद्ध बाजू पुराव्यानिशी सिद्ध झालेली आहे, अशा गोष्टींवर विश्वास ठेवतो, तो 'विश्वास+वेडा'. नेहमीच्या वापरात आणि अलीकडे लोकप्रिय होऊ लागलेला शब्द म्हणजे 'गूढविद्यावीर' (occuitnik), आणि अगदीच रोखठोक; पण सत्य शब्द म्हणजे 'भोळसट यडबंबू!'

हे रोखठोक शब्द कोण्या लुंग्यासुंग्या माणसाचे नसून डॉ. पॉल कुर्टझ यांची मी बफेलो येथील न्यूयॉर्क राज्यविद्यापीठात मुलाखत घेतली, त्या वेळी त्यांनी वापरलेले आहेत. कुर्टझ हे एक मोठे तत्त्ववेत्ते असून,

यू. एस. ह्युमॅनिस्ट असोसिएशनचे संचालक आहेत. ते म्हणाले, 'एके काळी अडाणी आणि मागासलेले लोक या असल्या विचारावर विश्वास ठेवत. आजकाल सुशिक्षित लोक आणि उच्चविद्याविभूषित लोकांचाही यात अंतर्भाव होतो. जणू काही भोळसटपणाचे आणि यडबंबूपणाचे युग अवतरले आहे. फारच भयानक घटना आहे ही माझ्या दृष्टीने! '

भयानक असण्याचे कारण हे की ज्योतिषशास्त्र अथवा पिरॅमिडशास्त्र असल्या गोष्टींवर विश्वास म्हणजे वास्तव आणि तर्क यापासून दूर पळण्याचे लक्षण असते. कदाचित तर्क आणि ज्ञान यांचे युग संपत आले असून पुन्हा एकदा आपण तमोयुगात बुडून जाणार असू. एकोणिसशेसत्तरीतील उत्तर अमेरिका आणि युद्धपूर्व जर्मनी यात त्यांनी सूचक साम्य दाखवले. १९ व्या शतकाच्या ३ ऱ्या दशकामध्ये जर्मन लोकांमध्ये चेटूकविद्या, ज्योतिषशास्त्र आणि गूढविद्या यावरील विश्वास खूप पसरलेला होता. सुसंगत विचारांनी प्रश्नाला सामोरे जाणे सोडून देण्यात आले होते. अशा प्रकारच्या मानसिक चौकटीतून अखेर मार्ग तयार झाला. आत्यंतिक अप्राकृततेचा— म्हणजेच फॅसिझमचा ! '

या असल्या विश्वासवेड्या किंवा गूढविद्यावीर किंवा अक्कलशून्य लोकांच्या पलटणी उभ्या रहात चाललेल्या पाहून कुर्टझ इतके चिंतातुर झाले की, त्यांनी ४० लोकांची एक 'अनैसर्गिक दाव्यांच्या सत्यासत्यतेचा शोध घेणारी समिती स्थापन केली. (Committee for the investigation of Claims of the Paranormal) अमेरिकन आणि कॅनडिअन ह्युमॅनिस्ट असोसिएशनच्या पंखाखाली काम करणाऱ्या या समितीमध्ये सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, अभियंते, मानसशास्त्रज्ञ, धंदेवाईक जादूगार आणि भारतीय विषयावर लेखन करणारे लोक आहेत.

मिशिगन येथील समाजशास्त्रज्ञ मार्सेलो त्रुझी हे या समितीचे एक अध्यक्ष होते. त्यांच्या म्हणण्यानुसार अतिनैसर्गिक क्षेत्रात आमच्या समितीचा ग्राहक पंचायतीसारखे काम करण्याचा उद्देश आहे.

'आम्ही या विश्वास ठेवणाऱ्या लोकांचेकडे जाऊन, त्यांच्या दृष्टीने अगदी खात्रीपूर्वक अशी उदाहरणे त्यांना दाखवायला सांगणार. हेतू हा की त्यातले तथ्य तपासता यावे. ही माहिती मग आम्ही सर्वसामान्य लोकांचेपर्यंत पोचवणार. हेतू हा की, त्याने या गूढ आणि अतिनैसर्गिक दाव्यांचा चिकित्सक वृत्तीने विचार करावा. यातले अनेक सिद्धांत पूर्वीच नाशाबित झाले आहेत; पण त्याचा प्रचार सर्वदूर झालेला नाही. उदाहरणार्थ दोन हजार वर्षांच्या तपश्चर्येने उभे राहिलेले पदार्थविज्ञानशास्त्र कोणी एक इसम आपण मन:सामर्थ्याने चमचे वाकवू शकतो, असा दावा करू लागला म्हणून त्याज्य ठरवणे म्हणजे मूर्खपणाचे आणि धोक्याचेही आहे.'

(या समितीच्या 'स्केप्टेटिक' या प्रकाशनाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंकात, इस्राएली गूढवादी युरी जेलर याचा आपण मनाचे सहाय्याने धातूच्या वस्तू वाकवू शकतो हा दावा बनवाबनवीचा आहे, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हा निव्वळ दृष्टिभ्रमाचा प्रकार आहे आणि अनेक जादूगार हा प्रयोग इतक्यांच सफाईने किंबहुना अधिक सफाईने— 'माझ्या मते... सिद्धांत पूर्णपणे... बनावट आहेत. हे कोणीही... संशोधक सहज सिद्ध करू शकतात; पण याबद्दल अधिक पुढे येणारच आहे.)

'माझ्या मते आजकाल प्रसिद्धी पावलेले सर्वच्या सर्व अति नैसर्गिक सिद्धांत पूर्णपणे खोटे बनावट आहेत, हे कोणीही सच्चा शास्त्रीय संशोधक सहज सिद्ध करू शकेल. या क्षेत्रात दोन महिने नेटाने काम केल्यावर माझे हे ठाम मत झाले आहे. खरं सांगतो अगदी भ्रमनिरास करणारा अनुभव होता हा. तथाकथित अतिनैसर्गिक सिद्धांताच्या बाजूने केला जाणारा युक्तिवाद म्हणजे बिनपुराव्याची व्यक्तिगत निवेदने, सिद्ध न झालेल्या कल्पना, सत्याचा विपर्यास, विरुद्ध पुराव्याला महत्त्व न देण्याचे वा तो लपवण्याचे प्रकार, शुद्ध कल्पनारम्यता, बनवाबनवी आणि इच्छानुसारी अथवा अप्राकृत विचार यांचा समुच्चय असतो.'

तुम्ही विचाराल, असे जर असेल तर या अतिनैसर्गिक गोष्टींवर विश्वास ठेवणाऱ्यांचे हे प्रचंड सैन्य कसे निर्माण झाले? या प्रश्नांची अनेक उत्तरे आहेत.

पहिले कारण हे की गेल्या काही दशकात बऱ्याच लोकांचा आतापर्यंतच्या सहाय्यक आणि शामक ठरणाऱ्या प्रस्थापित मार्गावरील विश्वास उडाला आहे. हे मार्ग म्हणजे औषधोपचार, मानसशास्त्र आणि धर्म. ही पोकळी बऱ्याचशा प्रमाणात अतिनैसर्गिक आणि गूढवादी गोष्टींच्यावर टाकण्यात येणाऱ्या विश्वासाने भरून काढली आहे. हा पर्याय स्वीकारण्याचेही तर्कशुद्ध कारण आहे. जग हे अतिशय गुंतागुंतीचे आणि प्रचंड होऊ लागल्यामुळे आपण साधी सोपी उत्तरे आणि सुस्पष्ट मार्गदर्शन लाभण्यासाठी धडपडत असतो. अतिनैसर्गिक सिद्धांतापैकी एखाद्यावर श्रद्धा बाळगतो. उदा. ज्योतिषशास्त्र, की ही गरज सुरेखपणे पूर्ण होते. शिवाय यातून आणखी एक मानवी गरज पूर्ण होते. ती म्हणजे अद्‌भुताची कल्पना रम्यतेची आणि दूर कोठल्या तरी गूढ शक्ती आपल्या जीवनाचे नियंत्रण करताहेत अशा कल्पनांची आवड.

शिवाय या प्रकारातून मुबलक पैसा मिळविता येतो हेही एक कारण या अतिनैसर्गिक सिद्धांतावरील विश्वासाचे मागे आहे हेही दुर्लक्षिता येणार नाही. बनावट वस्तू वा कल्पनांचा प्रसार करण्याचा अनुभव असणाऱ्यासकट काही बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे लोक या क्षेत्रात घुसले आहेत. जीन डिक्सन, युरी जेलर, एरिक फॉन डॅनिकेन, अॅलन स्प्रॅगेट, चार्लस् बारलिट्स, कॅरॉल राइटर आणि असेच डझनावारी इतर. या सर्वांचे वृत्तपत्रातील स्तंभ, मासिकातील लेख, पुस्तके, आकाशवाणीवरील भाषणे आणि अन्य मार्गांनी हे लोक लक्षावधींचेपर्यंत पोचत असतात. त्यांच्या हस्तकार्याला कोणी आव्हानही देत नाही. कारण या वार्तामाध्यमांची खात्री पटलेली असते, की खळबळजनक दाव्यांना आणि बिनपुराव्याचे असले तरी, ते खोटे ठरवणाऱ्या विद्वत्तापूर्ण प्रबंधापेक्षा जास्त गिऱ्हाईक लाभते.

उदाहरणच द्यायचे झाले तर 'बर्म्युडा त्रिकोण रहस्याचा उलगडा' या कोलोरॅडो येथील एक ग्रंथपाल आणि संशोधक लॉरेन्स कुशके याने लिहिलेल्या पुस्तकाचे देता येईल. तीन वर्षे कष्टपूर्ण संशोधन करून कुशकेने असे सिद्ध केले की, तथाकथित बर्म्युडा त्रिकोण, हे काही लेखकांनी जाणूनबुजून अथवा अभावितपणे, चुकीच्या कल्पना,

चुकीचा युक्तिवाद आणि खळबळजनक वृत्तांची आवड यांचा उपयोग करून कृत्रिमरीत्या उत्पादन केलेले गूढ आहे.

पण हे पुस्तक फारसे खपलेच नाही. या उलट बर्म्युडा त्रिकोणाची कथा प्रस्थापित करण्यात महत्त्वाचा भाग घेणारे खळबळजनक पण असत्य असे चार्लस् बर्लिट्चे पुस्तक दशलक्षांनी खपले. लॅरी कुशकेने मला सांगितले, 'वैचित्र्यपूर्ण खोटी माहिती ही साध्यासुध्या खऱ्या माहितीपेक्षा जास्त खपते.

आता हा विषय निघालाच आहे, तर माझ्या अति नैसर्गिक प्रकाराबद्दलच्या अहवालाला या बर्म्युडा त्रिकोणापासूनच सुरुवात केलेली बरी. माझ्या संशोधनानंतर मी पुरापुरा संशयवादी आणि अश्रद्ध का बनलो हे तुम्हाला समजण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

## बर्म्युडा त्रिकोण

बर्म्युडा त्रिकोण हा साधारणपणे बर्म्युडा, फ्लॉरिडा आणि प्यूटोरीको यांच्यामधला अॅटलांटिक महासागराचा पाण्याचा तुकडा आहे. मुख्यत्वेकरून गेल्या २५ वर्षांत या त्रिकोणाबद्दल प्रसिद्ध झालेल्या भीतिदायक आणि भयानक पुस्तकांमुळे आणि नियतकालिकांतील लेखांमुळे या त्रिकोणाचा दरारा प्रस्थापित झाला आहे. असे म्हटले जाते की, या त्रिकोणातून प्रवास करत असता, १९०० सालापासून आजपर्यंत सुमारे एक हजार खलाशी आणि हवाई प्रवासी प्राणाला मुकले आहेत. सुमारे २० विमाने आणि ५० जहाजे यांना इथे झालेल्या अपघातांपैकी एकाचेही कारण निश्चित करता आले नाही, अशीही आपल्याला खात्री देण्यात येते आणि बहुतेक प्रकरणात हीच कहाणी पुढे चालू– सर्व अपघातग्रस्त काही एक मागमूस न ठेवता अदृश्य झाले–प्रेते नाहीत, अवशेष नाहीत, तेलाचे तवंग नाहीत, तराफे नाहीत, जीवरक्षक होड्या नाहीत.

या त्रिकोणाचे 'इतिहासलेखक' या विचित्र प्रकारांची मोठी विक्षिप्त स्पष्टीकरणे सादर करतात. उदाहरणार्थ, असे सांगितले जाते की, इथे चुकलेले खलाशी आणि हवाई सैनिक अवकाशातील कृष्णविवरात अडकले असावेत. कृष्णविवर हा एक चतुर्थ मिती आणि काल–स्थलाचा गुंता आहे किंवा उडत्या तबकड्यांनी त्यांना पकडून त्यांच्या अंतरिक्ष प्राणिसंग्रहालयात ठेवण्याकरता नेले असावे. या त्रिकोणात लोक अदृश्य होण्याची आणखी काही कारणे–समुद्रराक्षसांचा हल्ला, हरवलेल्या अॅटलांटिक महानगरीतून येणारे मृत्युकिरण, राक्षसी पाण्याचे स्तंभ.

कॅनडामध्ये आणि अन्यत्र बर्म्युडा त्रिकोणाबाबतच्या या भंकस विधानांवर विश्वास ठेवणारे दशलक्षावधी लोक आहेत हे जीवनातले एक मोठे नैराश्य निर्माण करणारे सत्य आहे. मी भंकस म्हणतो ते अगदी जाणीवपूर्वक. बर्म्युडा त्रिकोणाच्या आख्यायिका ज्या 'संशोधना'वर आधारित आहेत त्याचा मी अभ्यास केला आणि माझ्यावर विश्वास ठेवा, हा सगळा मामला एकजात बनवाबनवीचा आहे, हे मला पटले. लॉरेन्स कुस्के याने या त्रिकोणाबाबत भगीरथ प्रयत्न करून संशोधन केले. त्याची मुलाखत घेतल्यावर एवढा एकच निर्णय घेणे शक्य आहे. विश्वासार्ह संशोधनाने सिद्ध झालेली त्रिकोणाबाबतची काही सत्ये अगदी साध्या भाषेत सांगतो हं–

१ : या त्रिकोणात नाहीशी झाली असे ज्यांच्याबद्दल सांगण्यात येते तशी अनेक वाहने त्या वेळी अस्तित्वातच नव्हती.

गूढ : एप्रिल १९६२ मधील एका स्वच्छ दिवशी, बहामा बेटातील नासाओ विमानतळावरील नियंत्रणमनोऱ्याला एका दोन इंजिनांच्या अॅपाके जातीच्या विमानाकडून मार्गदर्शन मागणारा संदेश आला. हे विमान उत्तर दिशेने २० मैल अंतरावरून येत होते. अचानक बिनतारी संपर्क तुटला आणि वैमानिकाला त्याचे लक्ष्य सहज दिसण्यासारखे असूनही हे विमान गूढपणे नाहीसे झाले.

सत्य : नासाऊ आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नागरी वाहतूक संचालक सांगतात, 'मी आणि माझे काही सहकारी याच विमानतळावर १९४६ पासून काम करीत आहोत. अशी हकीगत काही घडलेली आम्हाला बिलकूल आठवत नाही...हा कोणाच्या तरी कल्पनेचा विलास असावा एवढाच यातून निष्कर्ष काढणे भाग आहे.' या त्रिकोणाने गिळलेली आणखीही अनेक जहाजे आणि विमाने असेच कल्पनेचे विलास आहेत.

२ : जगातल्या इतर जलसंचयाइतकाच बर्म्युडा त्रिकोणही नौकानयनास धोक्याचा आहे.

जगातल्या कुठल्याही जलाशयात अधूनमधून जहाजे बुडतात ही गोष्ट सर्वांनाच ठाऊक आहे. गेल्या शंभरएक वर्षांत न्यूइंग्लंड आणि उत्तर युरोप यांमधल्या अॅटलांटिक महासागराच्या भागात सुमारे २०० जहाजे नाहीशी झालेली आहेत वा त्यातील लोकांनी सोडून दिलेली सापडली आहेत समुद्राच्या या भागालाही मग बर्म्युडा त्रिकोणासारखीच भयसूचक नावे देता येतील. चेटक्या समुद्र, संध्याछाया, भयानक भोवरा इ.

३ : बर्म्युडा त्रिकोणात झाल्याचे सांगण्यात येणारे अनेक अपघात प्रत्यक्षात तिथून खूपच दूर झालेले आहेत. यॉर्क ट्रान्सपोर्ट जातीचे एक ब्रिटिश विमान २ फेब्रुवारी १९५३ रोजी या त्रिकोणाचा बळी म्हणून यादीत समाविष्ट आहे. या विमानातून शेवटचा संदेश मिळाला त्या वेळी ते याच्या उत्तरेस ९०० मैलांवर होते आणि उत्तरेकडेच जात होते. हा म्हणे या त्रिकोणाचा बळी!

४ : इथे घडलेले अनेक अपघात जोराचे वादळ चालू असताना झालेले आहेत. या वादळांना त्या काळी भरपूर प्रसिद्धीही मिळालेली होती; पण दंतकथा सांगणारांनी हवामानाचा उल्लेख सफाईने टाळलेला आहे, कारण त्यामुळे सगळ्या गोष्टीचा रसभंग होणार होता.

एकच उदाहरण पहा : जानेवारी १९७८ मध्ये लक्षाधीश प्रकाशक हॅरी कॉनोव्हर त्याच्या खाजगी नौकेतून की वेस्ट ते मियामी हा १५० मैलांचा प्रवास करत असता नौकाकर्मचाऱ्यांसह नाहीसा झाला. भयानक बर्म्युडा त्रिकोणाच्या दुःखांतिकात आणखी एकीची भर पडली. कारण हवा सुद्धा त्या वेळी चांगली नव्हती का?

अगदी चूक. कारण अमेरिकी किनारा त्याच्या अधिकृत वृत्तांतानुसार, कॉनोव्हर आणि त्याचे कर्मचारी जवळजवळ तुफानी झंझावात म्हणता येईल अशा वादळात सापडले होते. दक्षिण फ्लॉरिडाच्या इतिहासात हिवाळ्याच्या मध्यावर इतके भयानक वादळ क्वचितच आढळते. आणखीही दोन जहाजे, याच काळात, याच परिसरात याच कारणाकरिता नापत्ता झाल्याची वार्ता त्या वेळी आलेली होती.

५ : काही वेळा काही जहाजे काहीही माणूस न ठेवता पूर्णपणे अदृश्य कशी होतात याचे सुसंगत स्पष्टीकरण देता येते.

यात गूढ काहीच नाही. समुद्रावरचे अनेक अपघात दुपारी उशीरा किंवा रात्री होतात. म्हणजेच शोध करणाऱ्यांना दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत काहीच दिसू शकत नाही. साहजिकच वादळी समुद्रात जे काय तरंगते अवशेष असतील त्यांचा निकाल लावायला १२ तास मिळतात.

अधूनमधून एखादे जहाज वा विमान नाहीसे होत असते आणि त्या वेळच्या परिस्थितीचे पूर्ण ज्ञान नसल्यामुळे आपण त्या घटनेने चक्रावून जातो; पण अशा 'रहस्यमय घटना' हेच नाव द्यायचे झाले तर सर्व जगभर सारख्याच प्रमाणात घडत असतात. 'यात बर्म्युडा त्रिकोणाचा विशेष असा काहीही नाही' तरी कुस्के सांगतो, 'या प्रदेशाबाबत गूढ वाटण्याचे काहीही कारण नाही!' □

रशिया–चीन : पृष्ठ ७ वरून

होता. लिनपिआओ आणि चौकडीचा बळी असे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचे वर्णन चीनमधील एका ट्रेडयुनियनच्या पत्राने केले आहे. त्यांचे पुनर्वसन झाले याचा अर्थ त्यांनी पुरस्कारलेल्या भूमिकेचा नव्याने विचार करण्याची चिनी नेत्यांची तयारी आहे.


दुसरा लक्षणीय बदल म्हणजे रशियाच्या प्रभुत्वाविरुद्ध संयुक्त आंतरराष्ट्रीय आघाडीचा पुरस्कार चिनी नेत्यांच्या भाषणातून आता केला जात नाही. उपपंतप्रधान हुंग क्षियाओ पिंग यांच्या अमेरिका-भेटीत या विषयावर भर दिलेला होता; पण अलीकडे चिनी नेत्यांची भाषणे व चिनी पत्रांत येणारे राजकीय समीक्षणाचे लेख या व या विषयाचा अभाव आढळतो.

नव्या वाटाघाटींसाठी चीनने काही अटी घातलेल्या नसल्या तरी त्याला त्या खरोखर मनापासून हव्या आहेत का, की आपल्याबद्दल जगात अनुकूल प्रतिमा घडवून आणण्याचा हा प्रयत्न आहे ? चीनच्या उद्देशांची सावधपूर्ण चाचपणी करूनच रशिया याबाबतीत पुढची पावले टाकील. यापूर्वी जानेवारी १९७१ मध्ये दोन्ही देशांनी एकमेकांविरुद्ध बळाचा वापर करू नये असा करार करण्याची सूचना रशियन नेत्यांनी गुप्तपणे केलेली होती; पण चीनने त्या वेळी ती फेटाळली.

बिनशर्त वाटाघाटींची सूचना चीनने केलेली असली तरी चीन–व्हिटनामसंघर्षाची पार्श्वभूमी लक्षात घेता सध्याचा काळ वाटाघाटींना अनुकूल नाही; पण रशियाने सूचना पूर्णपणे फेटाळून लावलेली नाही हे लक्षात घेता समझोता होऊ शकला तर रशियालाही तो हवा आहे असे त्यातून सूचित होते. वाटाघाटी सुरू झाल्या तरी त्यातून लौकर समझोता होईलच असा याचा अर्थ नाही; पण दोन्ही देश वाटाघाटींना तयार होत आहेत ही घटनाही काही कमी महत्त्वाची नाही. दीर्घ काळ बोलणी चालू ठेवून आपल्याला पाहिजे ते त्यातून साधण्यात चिनी नेते कुशल आहेत. ब्रेझनेव्ह यांची सध्याची प्रकृती लक्षात घेता आणखी फार काळ ते नेतृत्व करू शकतील असे वाटत नाही. अमेरिकेशी सामुद्रिक अण्वस्त्र प्रसारबंदीकराराचा दुसरा टप्पा पुरा केल्यानंतर ते निवृत्त होण्याचा संभव आहे. क्रुश्चेव्ह आणि माओच्या काळात कोणत्याही कारणाने संघर्ष झालेला असला तरी जागतिक कम्युनिस्ट चळवळीच्या भवितव्याच्या दृष्टीने दोन्ही देशांनी हे संघर्ष मिटवावेत असे वाटणारे गट दोन्ही देशांत आहेत. सरकारी पातळीवरील वाटाघाटी हा समझोत्याचा पहिला टप्पा असून त्याला खरे निर्णायक स्वरूप पक्षीय पातळीवरच्या वाटाघाटीतून येणार आहे.

रशिया–चीन समझोता होईल का हे आताच सांगणे कठीण आहे; पण एकच विचारप्रणाली मानणाऱ्या या देशांनी आपसात का भांडावे याचा उलगडा सामान्य कम्युनिस्ट कार्यकर्त्यास होत नाही. कम्युनिस्ट प्रणालीवर अखेर राष्ट्रीय हितसंबंधांनी मात केलेली असून त्यातूनच हे संघर्ष निर्माण झालेले आहेत. राष्ट्रीय हितसंबंधांपेक्षा व्यापक मानवतेची भूमिका प्रभावी ठरेल तेव्हाच हे संघर्ष खऱ्या अर्थाने मिटतील. केवळ काही तात्कालिक उद्देशांनी नव्हे तर अशा व्यापक भूमिकेवरून बोलणी होणार असतील तरच ती यशस्वी होतील.

रशिया चीन समझोत्याबद्दल व्हिएटनामची भूमिका काय राहील ? रशियाने आपल्याला दगा दिला असे व्हिएटनामी नेत्यांना वाटेल का ? व्हिएटनाम रशियाची किंवा पाश्चात्य राष्ट्रांचीसुद्धा मिळेल तेवढी मदत जरूर घेईल; पण कोणाच्या प्रभावाखाली न जाता स्वसामर्थ्यावर आपल्याला योग्य वाटेल त्या मार्गाने जाण्याचा कणखरपणा त्या देशाजवळ आहे. □



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

रंगभूमी । विनया खडपेकर

# अजून यौवनात मी

## 'केवळ करमणूक' म्हणूनच....

'नाट्यसुमन' निर्मिती 'अजून यौवनात मी' या नाटकाचे लेखक श्री. रत्नाकर मतकरी आहेत आणि दिग्दर्शन श्री. अरविंद देशपांडे यांनी केले आहे.

श्री. रत्नाकर मतकरी यांच्या या फार्स-वजा विनोदी नाटकाने एका नवीन उद्भवत असलेल्या सामाजिक मनोवृत्तीला स्पर्श केला आहे. आजच्या काळात प्रत्येक व्यक्ती तरुण दिसण्यासाठी, तारुण्य टिकविण्यासाठी धडपडत असते. तारुण्याशिवाय जीवन व्यर्थ असा समज रूढ होऊ पहातो आहे. तारुण्य टिकविण्याचा अट्टाहास हा या नाटकाचा विषय आहे.

पंधरा वर्षांपूर्वीचा प्रेमाचा पहिला दिवस जगायचा असे मन्मथ योजतो. त्यासाठी तो पत्नी त्रिवेणीला पंधरा वर्षांपूर्वी ती ज्या रंगाची साडी नेसली होती तशीच साडी आणतो. जुन्या गाण्याची ध्वनिमुद्रिका आणतो. शेवग्याच्या शेंगाही मिळवतो. त्रिवेणी स्वतःच्या सार्वजनिक कामाच्या व्यापात बुडालेली. शिवाय वय गेल्यावर ती उभारीही तिच्या ठिकाणी नाही. तिचा प्रतिसाद नसल्यामुळे तिच्याशी घटस्फोट घ्यायचे ठरवून तो तरुण पोरींबरोबर पार्टी एंजॉय करायचा बेत आखतो. त्यासाठी फुलाफुलांचा शर्ट घालून सजतो. मित्राला बोलावतो. मद्य आणले जाते. मुलगी मिळते; पण बेहोष व्हायला सळसळते तारुण्यच नाही हे त्याला कळून चुकते. मनात फक्त अट्टाहासाची भावना उरते—अजून यौवनात मी!

असा हा वैशिष्ट्यपूर्ण विषय नेहमीच्या चौकटीत कोंबल्यामुळे योग्य प्रकारे विकसित झाला नाही.

व्यसनांचे आकर्षण असलेला, भित्रा मध्यमवर्गीय बायकूळ, स्वच्छंदी अविवाहित प्रौढ कुमारी अलकनंदा, प्रमोशनच्या काळजीने 'माझी मुलगी तुमच्याकडे येईल' असे बोलला म्हणणारा लाचार बाप, ही ती नेहमीची चौकट. या नाटकाच्या विषयाला ही चौकट नकोच होती. यामुळे विषयाला विसंगत फाटे फुटून एक विस्कळितपणा आला आहे. एका बाजूला भास्करचे उपकथानक आहे. त्रिवेणीची महत्त्वाकांक्षा हे स्वतंत्र प्रकरण आहे. या सगळ्यात अपेक्षित एकसंधत्व नाही. शीतलचा बाप तिचा मित्र शोभावा इतका तरुण का दाखविला आहे ते कळत नाही. शीमल मधेच सरावलेली, धंदा करणारी मुलगी वाटते, तर मधेच बालिश, भाबडी मुलगी वाटते. मधेच परिस्थितीचा उपयोग करून घेत, राखून वागणारी चलाख मुलगी वाटते. तिचे व्यक्तिमत्त्व नीट उभेच राहिले नाही.

अनेक दोष असले तरी प्रेक्षकांना दोन-अडीच तास गुंगवून हसत ठेवणारे हे नाटक आहे. नाटकाचा प्रयोग निर्दोष आहे. विनोदात अश्लीलता नाही. श्रीकान्त मोघे (मन्मथ), अरविंद देशपांडे (बायकूळ); सुधीर जोशी (भास्कर), छोटू सावन्त (रघुपति), विनय आमडेकर (जमदग्नी), वंदना पंडित (शीतल), ज्योत्स्ना कार्येकर (अलकानंदा) भावना (त्रिवेणी) या सर्वच कलाकारांनी आपापल्या भूमिकेचे उचित भान ठेवले आहे.

वैशिष्ट्यपूर्ण विषय, समर्थ दिग्दर्शक; समंजस कलाकार यामुळे 'केवळ करमणूक' ही पातळी ओलांडून जायला हरकत नव्हती; पण रूढ सांकेतिकतेत गुरफटले गेल्यामुळे ती ओलांडता आली नाही. ❀

# कोपता वास्तुदेवता

## विस्कळित चित्र

कलावैभवनिर्मित 'कोपता वास्तुदेवता' या नाटकाचा पाचवा प्रयोग विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात ३ मे या दिवशी सादर झाला.

श्री. चि. त्र्यं. खानोलकर यांच्या 'अगोचर' या कादंबरीवर श्री. प्रियदर्शन कानेटकर यांनी रचलेले हे नाटक आहे. दिग्दर्शन श्री. मनोहर सहस्रबुद्धे यांचे आहे.


श्री. प्रियदर्शन वसंत कानेटकर अशी नाटककाराच्या संपूर्ण नावाने झळकणारी जाहिरात गेले काही दिवस लक्ष वेधून घेत होती. चि. त्र्यं. खानोलकरांची 'अगोचर' ही विलक्षण चित्तवेधक कादंबरीही वाचलेली होती. यामुळे नाटक पहाण्याची उत्सुकता होती. प्रथम केवळ नाटक म्हणून श्री. प्रियदर्शन कानेटकर यांच्या 'कोपता वास्तुदेवता'चा विचार करू आणि नंतर कादंबरीच्या तुलनेत ते कसे वाटते ते पाहू.

कोकणच्या खेडेगावातल्या आनंदराव देसाई या धूर्त आणि गुंड माणसाची ही कथा. तो सोन्याचा चोरटा व्यापार करतो. बायकांच्या बाबतीत त्याची नजर खराब आहे. स्वतःच्या भावजयांचाही तो अपवाद करीत नाही. असा हा आनंदराव एका सिद्ध पुरुषाला घरी आणून ठेवतो. या स्वामींची कीर्ती सगळीकडे पसरते. दर्शनासाठी गर्दी होऊ लागते. पक्वान्नांची भोजने घडवीत आनंदराव भक्तांकडून पैसे उकळू लागतो. गावच्या पंचांना ते सहन होत नाही. ते स्वामींना देवळात हलविण्याचा

बेत योजू लागतात. आनंदरावाचा मुलगा तातू कधी नशेत तर कधी शुद्धीत बापाची बदनामी करीत गावभर फिरत असतो. स्वतःची नाचक्की थांबविण्यासाठी आनंदराव तातूला खाडीत फेकण्याचा बेत आखतो; पण दादूभटामुळे तो तडीस जात नाही. मात्र नुसता मार खाऊनच तातू मरतो. तातूचे त्याच्या काकूवर–नंदिनीवर प्रेम असते. पण पतिव्रता नंदिनी मनात तातूबद्दल आकर्षक असूनही त्याच्या प्रेमाचा स्वीकार करीत नाही. तातूच्या मृत्यूनंतर स्वामींच्या जागी नंदिनीला तातूचा भास होतो. ते कपट वाटून ती उलटून बोलते. लोक तिला तुडवतात. शेवटी आनंदरावाची पत्नी आणि धाकटा भाऊ श्रीरंगा वाड्याला आग लावतात. वास्तुदेवता कोपते. दुष्टसुष्ट माणसांसकट वाडा अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडतो.

नाटकाची प्रकृती मनोविश्लेषणात्मक आहे. व्यक्तींच्या मानसिक आंदोलनांना येथे महत्त्व आहे. येथे साध्वी मोठी वहिनी आहे. फटकळ, प्रेमळ चारित्र्यवान दादू आहे. व्यवहारी गावपंच आहेत. पोरीचा अगतिक बाप आहे. सिद्धपुरुष क्षमाशील स्वामी आहेत. बावळट तरीही शहाणा अच्युत आहे. संयमी, संतप्त नंदिनी आहे. आनंदरावाची कथा सांगता सांगता देसायांच्या वाड्याचे चित्र दिसावे, एका गावाचे रंगरूप दिसावे, तेथील लहानमोठ्या व्यक्तींचे हेवेदावे, निष्ठा, प्रेम यांचे दर्शन घडावे असे हे अनेकपदरी कथानक आहे. हे एका गावगाड्याचे चित्र आहे.

परंतु हे विस्कळित चित्र आहे. याला कारणे अनेक आहेत. प्रथम म्हणजे कथावस्तूचे दोन वेगळे भाग पडले आहेत. एका भागाचा केंद्रबिंदू आहे आनंदराव व दुसऱ्या भागाची केंद्रबिंदू आहे नंदिनी. काही प्रसंग आनंदरावाभोवती आहेत. काही प्रसंग नंदिनीभोवती आहेत. या दोन भागात आवश्यक ते एकजिनसित्व नाही. यामुळे विषयाचा तोल बिघडतो. योग्य नेपथ्य, सुजाण अभिनय, पात्रानुकूल संवादशैली असल्यास विषयाचा तोल बिघडूनही नाटक प्रेक्षकांवर मोहिनी घालू शकते; परंतु येथे याही बाजूंनी नाटक ढासळलेच आहे. कोणत्या तरी पानांच्या चित्रांची पार्श्वभूमी कोकणच्या निसर्गाची साक्ष द्यायला समर्थ नाही. दाखविलेला वाडा कोकणातला ब्राह्मणी वाडा न वाटता मारवाड्याचे घर वाटते. पात्रांचे संवाद शहरी शैलीतीलच आहेत. फक्त मधेमधे मस, तुस असे शब्द आणि साल्या, रांडीच्या अशा शिव्या पेरून कोकणी वळण भाषेवर लादले आहे. रीमा लागू ( नंदिनी ) आणि सतीश दुभाषी ( दादूभट ) यांचा अपवाद वगळता बाकी कलाकारांना स्वतःच्या भूमिकेचे भान नाही. चंद्रकांत वैद्य ( आनंदराम ), अरुणा भट (वहिनी), विवेक लागू (तातू), नंदकुमार कुळकर्णी (अच्युत), माधव आचवल (स्वामी) आणि इतर अजय वढावकर, लीलाधर कांबळी, उदय कुंटे, विलास कोसके, शेखर बांदेकर, राजन वैद्य, प्रफुल्ल वायंगण-

हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे**

कर, प्रिया सगणेजण पाठ केलेले संवाद म्हणतात एवढेच. रंगभूषा, वेषभूषा लुच्च्या साधूसारखी वाटते. वहिनीसुद्धा मॉडर्न कोकणी स्त्री वाटते. सगळयाच बाजूंनी नाटक स्वतंत्र कलाकृती म्हणून अयशस्वी वाटते.

कादंबरीची तुलना करता तर ते फारच फिके वाटते. महाभारतातील आख्यानांचे लोकांना आवडेल, पचेल असे सुलभीकरण श्रीधर वगैरे मंडळी करीत असत. त्यामधे महाकाव्याचे धीरगंभीर सूक्ष्म रंग लोपवून भलत्याच रंगाला उठाव येत असे, तसेच येथे झाले आहे. चि. त्र्यं. खानोलकरांच्या कादंबरीतील सगळी सूक्ष्मताच नाटकात लोप पावली आहे. खानोलकरांच्या शब्दांतून दिसणारे स्वामी शरीराने अतिशय क्षीण परंतु आत्मज्ञानी, कर्माकर्मविवेक ज्यांच्या रक्तात भिनला आहे अशी व्यक्ती आहे, तर प्रियदर्शन कानेटकर यांचे स्वामी कोणतेच तत्त्वज्ञान नसलेले व्यक्तित्वहीन माणूस वाटतात. स्वामी ही कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा नाटकामध्ये अगदी कोपऱ्यात गेली आहे. खानोलकरांनी रंगविलेला आनंदराव जबरदस्त महत्त्वाकांक्षी, धूर्त, कर्तृत्ववान, कुमार्गी पुरुष आहे. त्याच्या दुष्कृत्यांचे कारण सत्तेची लालसा, तिला मिळालेली कर्तृत्वशक्तीची जोड हे आहे. त्याचा लंपटपणा नव्हे. म्हणूनच मुलगा नाचक्की करतो म्हटल्यावर बिनदिक्कत त्याच्या खुनाचा कट रचणारा आनंदराव नंदिनीच्या मनाविरुद्ध तिला स्पर्श करू शकत नाही. स्त्रीला भोगदासी बनविण्यात त्याचा आनंद आहे, तिच्यावर बलात्कार करण्यात नाही; परंतु प्रियदर्शन कानेटकर यांचा आनंदराव हिंदी चित्रपटातला खलनायक आहे. तो नंदिनीच्या खोलीत जाऊन तिच्या अंगावर सरळ हात ठेवतो. एवढेच नाही तर स्वामींच्यासमोरही तिच्यावर आक्रमण करण्याचे धाडस दाखवतो. नंदिनी–तात्रू प्रेम आणि संघर्ष, नंदिनी – अच्युत संघर्ष, आनंदराव दादूभट संघर्ष, आनंदराव आणि गाव यांची एकमेकांशी बांधिलकी, अंतर्ज्ञानी स्थितप्रज्ञ स्वामी यांचा खोलवर ठाव घेऊन खानोलकरांनी या सर्व घटकांची एकमेकांतील गुंतागुंत दाखवून एक जीवनदर्शन घडविले आहे. या जीवनदर्शनाचा एकदशांशही नाटकात उतरलेला नाही.

कादंबरीरूपांतर, लेखन, प्रयोग सर्वच दृष्टींनी हे अयशस्वी नाटक वाटते. □

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# पुन्हा एकदा गमन

## एक प्रयोग फसलेला

ही शिट्टी ऐकताय ना? ती माझ्या गावाकडं जाणाऱ्या गाडीची. माझी आई, माझी बहीण माझ्या वाटेकडं डोळे लावून बसल्या असतील. मलाही जायचंय हो, ही मुंबई सोडून जायचंय, इथले आसवांनी ओलावलेले पैसे नकोयत मला; पण गाडीचं तिकीट काढण्यासाठी तरी पैसे जमवायलाच पाहिजेत ना?

पैसे कमवायला म्हणून खेड्यातून मुंबईत आलेल्या आणि मुंबईच्या यंत्रजीवनात कळत-नकळत पिळवटून निघालेल्या अनेक तरुणांपैकी एक– स्टेशनातून लांबवर जाणाऱ्या गाडीकडे पाहत असतो आणि याच ठिकाणी गमन थांबतो.

गुलाम हे या तरुणाचे नाव. मुंबईत येऊन तो टॅक्सी-ड्रायव्हर बनतो; पण आपल्यासारख्याच एका टॅक्सी-ड्रायव्हरची दुर्दशा, दुसऱ्या टॅक्सीड्रायव्हरचा अपघाती मृत्यू आणि तिसऱ्या टॅक्सीड्रायव्हर–मित्राचा खून या घटनांमुळे गुलाम पूर्णपणे विटतो आणि गावाकडे जाऊ इच्छितो. यात आजारी आई आणि एकाकी वहिणीची ओढ असतेच. या गुलामचे मनोविश्लेषण हा गमनचा एक पैलू. गुलाम आणि त्याच्या सहवासात येणाऱ्या अन्य ड्रायव्हर्सच्या आयुष्यातील घटनांतून त्यांचे घडविलेले जीवनदर्शन हा गमनचा दुसरा पैलू. मुंबईच्या बाहेरच्या डामडौलाआड दडलेला माणसातील माणसाची ससेहोलपट करणारा त्या शहराचा विद्रूप, भेसूर सापळा हा गमनचा तिसरा पैलू; पण या तिन्ही भागांची एकमेकांशी नीट सांगड घातलेली नाहीच आणि हे तीन किंवा यांपैकी एक पैलूही ताकदीने पेश करण्यात न आल्याने संपूर्ण चित्रपट अत्यंत संथ, रटाळ व कंटाळवाणा बनला आहे. चित्रपटात कथा नामक प्रकाराचा जीव आधीच फार चिमुकला आहे. तो प्रकार पुढे नेण्यासाठी अथवा रेटण्यासाठी ज्या घटनानामक चिजा हव्यात, त्याही चित्रपटात अतिशय कमी आहेत. त्यामुळे प्रेक्षकाचा बराचसा वेळ टॅक्सीतून मुंबईत हिंडण्यात जातो, मग कधी गावातून पहिल्यांदाच मुंबईला आलेल्या गुलामला मुंबई दाखविण्यासाठी त्याचा मित्र लल्लू त्याला मुंबईत फिरवतो, नंतर गुलाम टॅक्सी चालवणे शिकत असताना आपण त्याच्याबरोबर मुंबईच्या रस्त्यांवरून भटकतो आणि गुलाम टॅक्सी शिकल्यानंतर त्याच्या सवाऱ्यांना पोहचविण्यासाठी मुंबईत हिंडतो. या सगळ्या फिरवाफिरवीतून 'समग्र मुंबई दर्शन' अशी एखादी अर्ध्या तासाची फिल्म सहज वेगळी निघू शकेल. नंतर मग उरलेल्या वेळापैकी बराच वेळ गुलामची त्याच्या वहिणीला–खैरूनला लिहिलेली पत्रे आणि तिने पाठवलेली उत्तरे यांच्या वाचनात जातो. यातून उरलेल्या हत्तीच्या शेपटाएवढ्या वेळात मग खून, अपघात, टॅक्सी-ड्रायव्हरांचे आयुष्य वगैरे वगैरे चिजा भराभर डोळ्यांपुढून सरकवल्या जातात. वेगवेगळ्या कोनांमधून आणि उंचीवरून टिपलेली मुंबईची दृश्ये ही पाहण्यास नयनवेधक वगैरे असली तरी

चित्रपटाला ती फार वेळ आणि वारंवार तारू शकत नाहीत.

गुलामच्या मनोविश्लेषणाबाबत—त्याचे टॅक्सी फिरवणे आणि पत्रे हे प्रकार वगळता ज्या थोड्याशा घटना त्याची गावाची, आईची, बहिणीची ओढ दाखवतात त्या फारच ढोबळ घेतल्या आहेत. उदाहरणार्थ-मुंबईत एक वरात आणि त्यातील वधू पाहून गुलामला डोळ्यांपुढे सेहरा बांधलेली बहीण दिसणे अथवा मिरवणुकीतील लेझीमचा खेळ बघून गावच्या मोहरमच्या मिरवणुकीची आठवण येणे.

गुलामच्या मित्राची प्रेयसी—यशोदा आणि तिच्या घरची स्थिती यांतून एका पिळवटलेल्या कुटुंबाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे; पण ते कुटुंब रत्नागिरीचे म्हटल्यावर उगाचच त्याची मराठी प्रादेशिकता जपण्याच्या प्रयत्नात त्या कुटुंबाची विस्कळित भग्नता कुठे तरी हरवून जाते.

गुलामला मुंबईतील एकेक ठिकाण दाखवताना लल्लूने मुंबईवर मारलेले टोमणेही निष्काळजी व अहेतुक वाटल्याने दुर्लक्षित राहतात.

तर अशा या बऱ्याच गोष्टी पकडण्याच्या नादात त्या सगळ्याच गोष्टी पूर्णतः निसटल्याने चित्रपट अत्यंत प्रभावहीन होतो. काही तुकड्यांचा मात्र उल्लेख करायलाच हवा.

१) गुलामला मिळणारे टॅक्सी चालवण्याचे शिक्षण. काही ठिकाणी वर्गातील निवेदन आणि काही ठिकाणी रस्त्यावरील प्रशिक्षण अशा तुकड्यांमधून बनणारा हा भाग सुरेख उतरला आहे.

२) म्हातारपणामुळे टॅक्सी चालवायला मिळत नाही, म्हणून वेडसरलेला यशोदेचा बाप; त्याची प्रत्येकाजवळ चालणारी पेट्रोलची मागणी आणि शेवटी पेट्रोल मिळाल्यानंतर ते घेऊन समुद्र जाळण्याचा त्याने केलेला प्रयत्न यांतून कुठे तरी त्याच्या स्वप्नांचे तुकडे पाहण्यास मिळतात.

३) चित्रपटातील लल्लू व यशोदाचे काही प्रसंग.

४) चित्रपटातील गाण्यांची निवड आणि जागा सुरेख असूनही बहुतेक गाण्यांचे चित्रण मात्र तोचतोचपणा अथवा मुंबई दाखविणे या प्रकारांनी कंटाळवाणे बनले आहे.

चित्रपटात गुलामच्या बहिणीची व आईची पत्रातून अथवा त्याच्या विचार-दृश्यांतून मिळालेली माहिती दाखवलेल्या प्रसंगांनी फारशी वाढत नाहीच. त्यांचे पुन्हा पुन्हा त्याच उदास चेहऱ्यांनी पडद्यावर असणेही चित्रपटाच्या लांबीत भर घालण्याव्यतिरिक्त फारसे काही करीत नाहीत.

वास्तवाचा अतिरेक हा 'गमन'चा एक वैशिष्टयपूर्ण दोष (आणि तोही विशेषतः संवादांच्या बाबतीत) म्हणता येईल. आधीच मरगळलेला चित्रपटाचा वेग पार भुईसपाट करून टाकणारे संवाद—हे संवादलेखनाचे काम बहुधा आयत्या वेळी पात्रांनाच तोंडी करायला सांगितल्यासारखे वाटते. शिवाय वातावरण वास्तव उभे करण्यासाठी दोन जोड्यांचे आपापसातील संवाद एकाच वेळी चालू राहतात आणि प्रेक्षकाचे दोन्हीकडे छान दुर्लक्ष होते. संवाद ऐकू न येणे आणि त्यामुळे संदर्भ न लागणे या प्रकारात चित्रपटगृहातील अत्यंत सदोष ध्वनिक्षेपणही जबाबदार होतेच.

चित्रपटात गुलाम, त्याची बहीण वगैरे, त्याचा मित्र लल्लू आणि यशोदा यांच्या भूमिका अनुक्रमे फारूक शेख, स्मिता पाटील, जलाल आगा आणि गीता सिद्धार्थ यांनी केल्या आहेत; पण या अथवा चित्रपटातील अन्य भूमिका करण्यासाठी हे अथवा अन्य अभिनेते असते तरी काहीही फरक पडला नसता.

चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक मुजफ्फरअली आहेत. एकाच वेळी बऱ्याच डगरींवर हात ठेवण्याच्या नादात हात आणि पायही कमी पडल्यामुळे त्यांनी चित्रपटाचा तोल सपशेल ढासळून टाकला.

स्व. मकदूम मोहिउद्दीन आणि शहरयार यांची पाच गीते आणि त्यांना लाभलेले जयदेवाचे संगीत मात्र अत्यंत सकस आहे. 'रस से भरे तोरे नैन, साँवरिया' आणि 'सीने में जलन, आँख में तूफान सा क्यों है? इस शहर में हर शख्स परेशान—सा क्यों है?' ही लक्षात राहिलेली गीते.

'गमन' त्याच्या स्वतःच्या उद्दिष्टपूर्तीमध्ये फसलेला असला तरी हिंदी चित्रपटाच्या ठरीव साच्यांमध्ये त्याचे वेगळेपण निःसंशय उठून दिसते. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

इंग्रजी चित्रपट । चंद्रशेखर पुरंदरे

# ओ लकी मॅन

## प्रस्थापितावर एक कलापूर्ण हल्ला

एक महत्त्वाकांक्षी तरुण; पण महत्त्वाकांक्षेने धूर्त किंवा कावेबाज न होता अधिकच भोळा झालेला. त्याला 'टॉप' ला जायचं आहे. मर्यादेत राहून शॉर्ट कट घेण्याचा त्याचा प्रयत्न. त्यात अधिकाधिक रुतणं आणि त्यासाठी द्यावी लागणारी जबरदस्त किंमत आणि हे सारं प्रस्थापितावर जहरी टीका करत लिंडसे अँडरसन हा दिग्दर्शक माल्कम मॅकडोवेलच्या कमाल बोलक्या चेहऱ्यातून आणि डोळ्यातून आपल्याला संथपणे सांगतो. माल्कम मॅकडोवेल हा या तरुणाचं काम करणारा नट. त्याचं चित्रपटातलं नांव मायकेल.

कोण्या एका इम्पीरिअल कॉफी कंपनीचा हा स्कॉटलंडमधला चीफ इन्स्पेक्टर. सेल वाढवणं हे त्याचं प्रमुख काम. योगायोगानं स्कॉटलंडमधल्या आधीच्या इन्स्पेक्टरनं काम सोडल्यानं याला लहान वयात, अनुभव नसताना ही संधी मिळाली आहे.

कंपनीतर्फे मिळालेल्या कारमधून तो स्कॉटलंडला निघतो आणि पहिला सामना पोलिसांशी होतो. रस्त्यावरच्या धुक्यामुळं झालेल्या अॅक्सिडेंटचा साक्षीदार एकटा मायकेल. त्याची साक्ष देण्याची इच्छा आहे; पण पोलिसांचीच त्याची जबानी नोंदवून घेण्याची नाही. अॅक्सिडेंटमध्ये मोडलेल्या ट्रकमधले फूडटिन्स त्यांच्या पेट्रोलकारमध्ये भरले जातात, मायकेललाही एक फूडटिन मिळतो आणि इथेच त्याच्या घसरगुंडीला सुरुवात होते. मग स्कॉटलंड. तिथं सदरलॅंड हॉटेल. सेल प्रथम वाढत जातो 'बिझिनेस म्हणजे काही गोष्टी करायलाच पाहिजेत' अशा प्रामाणिक समजुतीने ब्लू मूहीन्ज स्कॉच व्हिस्कीचे कार्टन्स न रात्री हॉटेलातली मिसेस बोल असा मायकेलचा दिनक्रम. सेल घसरतो. मग बदली. स्कॉटलंडमधल्या त्या सरदलंड हॉटेलातला मायकेलचा शेजारी, एक गूढ म्हातारा असतो तो त्याला जाताना एकच वाक्य सांगतो–Try not to die as a dog पुढच्या प्रवासात चुकून मायकेल एका अणुकेंद्रापाशी येतो. No Entry ची पाटी दुर्लक्षून. त्याची रवानगी इंटेलिजन्स ब्यूरोकडे होते. सरळ हेरगिरीचा आरोप होतो. जे तो नाहीच ते तो टॉर्चरमुळं कबूल करतो. 'रशियन हेर आहे, ३०० रुबल्स मिळतात वगैरे वगैरे. वरचा ओठ रक्ताळवणारी एक मुस्काडीत आणि हात बांधून दिलेले काही शॉक्स हे त्याला Confession वर सही करायला लावायला पुरसे होतात. तिथून स्फोट झाल्यानं तो सुटतो आणि एका स्वर्गमय जगात येतो. इथं निर्मळ झरे असतात; पक्ष्यांची किलबिल असते, स्वच्छ सूर्य-प्रकाश, श्रद्धाळू माणसं, छानसं चर्च; त्यातल्या धर्मगुरूची वात्सल्यपूर्ण पत्नी, तिची दोन गोजिरी मुलं–खोटेपणानं आणि टॉर्चरनं झालेल्या मानसिक व शारीरिक यातना तो विसरतो आणि अणुकेंद्रातून सुटतानाच त्याची कंपनीची कार भस्मसात झाल्याचं पाहून कॉफी कंपनीही विसरणं त्याला भाग असतं. नव्या उत्साहानं तो चर्चमधून हमरस्त्यावर येतो भविष्य रिकामंच असतं. अशा वेळी 'मिलर्स क्लिनिक' च्या गाडीमध्ये त्याला 'लिफ्ट'. मिळते. हे प्रोफेसर मिलरचं क्लिनिक. त्याच्या शरीरावर सात दिवस प्रयोग करण्याला १४० पौंडांच्या आमिषानं तिथं तो दाखल होतो. प्रोफेसर मिलरच्या प्रयोगाची दिशा त्याला रात्रीचं नर्सशी त्याचं झालेलं संभाषण ऐकून कळते. त्याचा डिनॉसेरस करण्यासाठी त्याला आणलेला असतो. जवळच्याच खोलीतला एकजण फक्त मानवी मुंडकं आणि धड भयानक गलेलठ्ठ रानडुकराचं असा झालेला आणि तळमळत पडलेला तो पहातो आणि जिवाच्या करारानं त्या दुसऱ्या भयाण जगातून पळतो.

परत एक प्रसन्न प्रवास. एका ऑर्केस्ट्राबरोबर तो लंडनला येतो. या ऑर्केस्ट्राबरोबरच त्याला पॅट्रिशिया भेटते. ही सर जेम्सची मुलगी. सर जेम्स हा इंग्लंडचा फार मोठा उद्योगपती. त्याचं ऑफिसच गगनचुंबी. मायकेल पॅट्रिशियानं तिच्या बापाशी त्याची ओळख करून द्यावी म्हणून लकडा लावतो. ती हसून टाळते, त्याला आपला बाप हा Most evil & ruthless man in the world असल्याचं सांगते. त्यांच्या प्रत्येक मिलियन पौंडासाठी कित्येक हजार गरीब शेतकरी अन्नान्नदशा होऊन गेले हेही सांगते; पण याच्या डोक्यात निराळंच वारं. तो क्लृप्त्या लढवून सर जेम्सकडे जातो. तिथं त्याच्या डोळ्यांदेखत त्या प्रचंड इमारतीच्या वरच्या मजल्यावरच्या सर जेम्सच्या ऑफिसातून प्रोफेसर स्टुअर्ट हा सर जेम्सपायी उद्ध्वस्त झालेला माणूस खाली उडी टाकतो. त्याला वाचवायचा प्रयत्न करणारा सर जेम्सचा देखणा असिस्टंटही सरळ खाली त्याच्याबरोबर जातो. दोघं काही क्षणात ठार मरतात.

सर जेम्स शांतपणे आपल्या सहकाऱ्यांना बोलावून फायलीतून स्टुअर्टचा बायोडेटा (biodata) सांगतो आणि १५ सेकंदांच्या श्रद्धांजलीत 'माझ्या आयुष्याची पंचावन्न वर्षं वाया गेली म्हणून समूळ भकास झालेला, रडणारा, तोल सुटलेला बुद्धिमान प्रो. स्टुअर्ट विसरला जातो. त्याचीच किंमत ५४० पौंड, त्याच्या विधवेला मिळते.

मायकेल सर जेम्सचा नवा असिस्टंट. आता त्याची भूक शमली आहे. पॅट्रिशियाशी त्याचं प्रेम आहेच. 'सर जेम्सला नवीन ठिकाणी पैसा गुंतवायचा आहे. झिंगारा हे आफ्रिकेतलं छोटं बेट. त्याचा परराष्ट्रमंत्री त्याला भेटायला आलेला आहे. तिथली स्थानिक माणसं कशी पटकन ठार मारता येतील आणि बेटात पैसा गुंतवल्यावर कसं त्याचं सोनं होईल, हे तो सर जेम्सला पटवतो. यात कायदेशीर काहीच नाही. त्यात नेमक्या देवाण–घेवाणीच्या वेळी धाड पडते आणि मायकेल बळीचा बकरा होतो. बाकीचे शांतपणे उद्योग चालू ठेवतात. सर जेम्स यावर म्हणतो The line between House of Commons & Jait is too thin !' सगळे खळखळून हसतात आणि मायकेल पाच वर्षं सक्तमजुरीवर.

तिथनं सुटल्यावर तो साधं आयुष्य जगू इच्छितो; पण ते त्याच्या नशिबी नाही. तो मानवतेनं पछाडलेला आहे. जगण्यात काहीही रस नसणारा आता Nihilists च्या ग्रुपला हॉट सूप द्यायला तो जातो तर We don't want your filthy charity म्हणून त्याला दगडांनी ठेचून मारायला सगळे उठतात. याच शून्यवाद्यांमध्ये त्याची पॅट्रिशियाही असते तिच्या नवऱ्याबरोबर...

जीव वाचवून पळणारा मायकेल तिथून फूटपाथवर धक्के खात हिंडतो आहे. शेवटी स्टार बनायला तो जातो आणि स्क्रीन टेस्ट देतो. तिथं विद्यार्थी म्हणून, सैनिक म्हणून तो पोझेस देतो; पण 'Smile' सांगितल्यावर हतबुद्ध होतो. 'कशासाठी हसायचं?' असं विचारतो. मुस्काडीत खातो आणि या प्रवासात हसू हरवलेल्या त्या लकी मॅनच्या डोळ्यांसमोरून सारं आयुष्य फिरतं–सगळे नाचताहेत–ते त्याचं टॉर्चर करणारे इंटेलिजण्ट सर्व्हिसचे दोघंजण, चर्चमधली विकार्स वाइफ, प्रोफेसर मिलर सगळे नाचत आहेत, त्याला शिक्षा ठोठावणारा जज्ज नाचतो आहे, प्रो. स्टुअर्ट नाचतो आहे, त्याची पॅट्रिशिया नाचते आहे, तो नाचतो आहे, स्वप्नांच्या फुग्यांसाठी सगळे नाचत आहेत.

इथं सिनेमा संपतो. त्याची दोन प्रमुख वैशिष्टयं. एक सिनेमाभर एक सुंदर गाणं आहे. ते मायकेलच्या प्रवासाच्या टप्प्यांना साजेसं. देखणा ॲलन प्राइस ते पडद्यावर म्हणतो. तोच त्याचा कवी आणि संगीतकारही आहे. या गाण्याची चाल आणि शब्द अतिशय रेखीव आहेत. 'Lucky Man' हेच त्याचं ध्रुपद. हाच सिनेमातला ऑर्केस्ट्रावाला. तो सिनेमात आहे आणि नाहीही.

अशक्यता आणि वास्तवता यांच्या सीमेवर संपूर्ण सिनेमा रेंगाळतो त्याचे हे एक ठळक उदाहरण.

दुसरं वैशिष्टय म्हणजे एकेक नट दोन-दोन, तीन-तीन भूमिकांत आहे. सदरलॅंड हॉटेलमधला गूढ म्हाताराच सर जेम्स म्हणून जरा वेळानं आपल्या भेटीला येतो आणि तेव्हा Try not to die as a dog सांगणारा तोच सर जेम्सच्या नात्यानं मायकेलला कुत्र्याच्या मौतीनं मारायची वेळ आणतो.

मायकेलला प्रमोशन देऊन चीफ इन्स्पेक्टर झाल्याबद्दल इंग्लंडचा मॅप आणि गुडलक देणारा कॉफी-कंपनीचा मॅनेजरच त्याच्या जेलचा अधिकारी आहे. तो त्याला आता ५ वर्षांनी सुटताना त्याच्या आजीनं त्याला दिलेलं पुस्तक देतो आणि त्यानं स्फूर्ती येईल म्हणतो.

अणुकेन्द्रात टॉर्चर करणाराच सर जेम्सचा असिस्टंट म्हणून मरतो आणि जेलमधला सहकैदी म्हणून याच्याबरोबर येतो. तोच शेवटी स्क्रीन टेस्ट घेतो.

या वानगीदाखल तिघांच्या विभिन्न भूमिका सांगितल्या. अशा अनेक. प्रत्येकाचा विरोध तीव्र. प्रत्येकाचे संदर्भातले स्थान विशेष महत्त्वाचे. या नव्या प्रकाराने चित्रपट फार निराळ्या पातळीवर गेला आहे. तथाकथित प्रायोगिकता म्हणून Pseudo–intellectual आज जो तमाशा करीत आहेत, त्याच्याशी अर्थात तुलना करणेच चुकीचे; पण नक्कलही भ्रष्ट असू शकते हे कळण्यासाठी तरी हे अस्सल पहायला हरकत नाही.

माल्कम मॅक्डोवेलनं मायकेलचं काम केलं आहे. मुख्य कल्पना त्याचीच आहे. रूढदृष्टया हा कुरूप इसम; पण कमालीचा बोलका चेहरा. पूर्ण तीव्रतेनं तो प्रेक्षकांपर्यंत सडक्या समाजाचं ते जहर पोचवतो. राल्फ रिचर्डसन हा सर जेम्स आहे. हेलन मिरन ही पॅट्रिशिया. सर जेम्सचा दगडीपणा; पॅट्रिशियाचे धर्मापासून जीवनावरच श्रद्धा नसलेल्यांपर्यंतचे परिवर्तन हे दोघांनीही अनुक्रमे सुंदर वठवले आहेत प्रोफेसर मिलरच्या डोळ्यांतली Malicious, चमक, धर्मगुरूच्या बायकोची (हीच हॉटेलातली मिसेस बो, जिनं मायकेलला प्रणयाचे धडे दिले) सात्त्विकता हे असेच निखळ कलानंद देणारे शॉट्स्.

आणि या साऱ्याबरोबर पोलिस, व्यापारी, इंटेलिजन्स सर्व्हिसेस, विज्ञान, उद्योगपती, राजकारणी, आन्तरराष्ट्रीय कट, न्यायसंस्था, नकारवादी या साऱ्यांचं इतकं खरंखुरं, तेही कुठंही भडक न होता, दर्शन घडवलं आहे की, त्यामुळे प्रेक्षक खरा अस्वस्थ होतो. इतक्या विषयांना त्यात स्पर्श केला आहे की, सगळ्याचा आढावा घेणेही शक्य नाही.

विशेषत: न्यायसंस्थेवर तर फारच झोंबरी टीका आहे, बाहेर 'Society is based on faith...' म्हणून मायकेलला पाच वर्षांची सजा देणारा जज्ज आत गेल्यावर स्वत: आसूड खाऊन येतो हा प्रसंग तर फार काही सुचवून जातो.

तसंच शेवटचं सगळ्या पात्रांचं लयबद्ध नाचणं अतिशय सुंदर formation चं ते उदाहरण.

आणि तसेच ते मोटारीतून जाताना रेडिओवर बदलत्या हवामानाचे अंदाज ते मायकेलच्या परिस्थितीशी synchronized असणारे, निऑन साइन्सच्या न्यूज बुलेटिन्सवर फक्त हिंसेची, हत्येची, दहशतवाद्यांची फिरणारी बुलेटिन्स. त्या नकारवाद्यांचा कळप तर पुरा अस्वस्थ करतो त्यांच्या मागच्या भिंतीवर लिहिलं आहे– Revolution is the opium of intellectuals. या सगळ्या वारकाव्यातून दिग्दर्शक लीडर्स अँडरसन बोलत असतो, खुणावत असतो.

वॉर्नर ब्रदर्सचा हा चित्रपट सुरू होतो तो १८ व्या शतकातल्या कॉफीमळ्यांच्या दृश्याने. त्या वेळी कॉफीच्या बिया चोरल्याबद्दल चोराला दोन्ही हात तलवारीने तोडण्याची शिक्षा होते. तिथून न्यायसंस्थेवर हल्ला जो सुरू होतो तो शेवटपर्यंत चालूच.

मध्ये मध्ये नाटकात पडदा टाकून स्टेजवर पुनर्रचना करावी तसाच काहीसा लेव्हल्स बदलण्याचा प्रकार इथेही आहे. तेव्हा पडदा पूर्ण काळा होतो आणि सिनेमा गिअर बदलतो.

बोचरी, नि:संदिग्ध Captions ही येतात. ती कधी व्यक्तीच्या आयुष्याच्या क्षुद्रतेवर बोलतात, तर कधी जगाच्या गतीबद्दल.

आणि या साऱ्यात ॲलन प्राइस गातच असतो. तो आणि त्याचा ऑर्केस्ट्रा–

If you know what you are,
And if you are what you are,
You're a lucky man !

□